



# गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026

संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com





* वर्ष ६५ वे * अंक ४१ * नांदेड * गुरूवार, दि. १२ फेब्रुवारी २०२६ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎ : 255777, Fax :252211

# मुखेड तालुक्यात भूकंपाचे सौम्य धक्के

## नागरिकांनी सतर्क राहण्याचे जिल्हाधिकारी यांचे आवाहन

**नांदेड (प्रतिनिधी)–** मुखेड तालुक्यात बुधवारी दुपारी भूकंपाचे सौम्य धक्के जाणवले आहेत. यामुळे नागरिकांत भितीचे वातावरण पसरले असून नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी केले आहे.

मुखेड तालुक्यातील हिब्बट, कोळगाव, धामणगाव, मोटरगा, धनज व जामखेड या गावांमधून बुधवार, दि. ११ फेब्रुवारी २०२६ रोजी दुपारी ०३:२५ मी. वाजता भूगर्भातून आवाज येऊन जमीन हादरली असल्याची माहिती ग्रामस्थांनी प्रशासनाला दिली होती. त्यानुसार राष्ट्रीय भूकंप विज्ञान केंद्राच्या संकेतस्थळावर तपासले असता दि. ११ फेब्रुवारी २०२६ रोजी दुपारी ३.२० मिनिटांनी या धक्क्याची नोंद झाली असून या धक्क्याची तीव्रता रिश्टर स्केलवर ३.० एवढी नोंदविण्यात आली असून याचा केंद्रबिंदु नांदेड जिल्ह्यातील मुखेड तालुक्यातील खपराळ गावाजवळ असल्याचे कळते. सदर धक्का हा अतिसौम्य प्रकारचा आहे.तसेच या धक्क्यामुळे कुठलीही जीवित व वित्त हानी झाली नसल्याबाबत तहसीलदार मुखेड यांनी जिल्हा आपत्कालीन कार्यकेंद्रास कळविले आहे.

नागरिकांनी घाबरून न जाता सतर्क रहावे. तसेच गावात ज्या लोकांच्या घराचे छत पत्र्याचे आहे व त्यांनी पत्र्यावर आधारासाठी दगड ठेवले आहेत त्यांनी सुरक्षिततेचा भाग म्हणून त्वरित दगड काढून घ्यावेत व पत्रे बोल्ट ने फिट करून घ्यावीत. पुन्हा असा आवाज आलाच तर पटकन घराबाहेर मोकळ्या जागेत गोळा व्हावे व प्रशासनाला (०२४६२) २३५०७७ या क्रमांकावर संपर्क करून कळवावे तसेच कोणत्याही अफवांनावर विश्वास ठेवू नये असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी जनतेला केले आहे.

# इस्लापूरच्या दयालधानोरा शिवारात अस्वलाचा धुमाकूळ

## ९ जणांवर हल्ला; एकाचा मृत्यू, चौघे गंभीर





**किनवट (प्रतिनिधी)–** तालुक्याच्या इस्लापूर परिसरातील दयालधानोरा येथे मंगळवारी (दि. १०) मध्यरात्री अस्वलाने धुमाकूळ घालत सलग ९ शेतकऱ्यांवर जीवघेणा हल्ला केल्याची धक्कादायक घटना घडली. या हल्ल्यात दत्ता बळीराम जाधव या शेतकऱ्याचा मृत्यू झाला. तर इतर चौघांची प्रकृती गंभीर आहे.

इस्लापूर परिसरातील दयालधानोरा शिवारात शेतकरी नेहमीप्रमाणे मंगळवारी रात्री पिकाचे संरक्षण करण्यासाठी तसेच पिकाला पाणी देण्यासाठी शेतात गेले होते. मध्यरात्रीच्या सुमारास शिवारातील पिकात दबा धरून बसलेल्या अस्वलाने अचानकच शेतकरी दत्ता बळीराम जाधव व रमेश बळीराम जाधव यांच्यावर हल्ला चढविला. बचावासाठी त्यांनी आरडाओरड केल्यानंतर आजूबाजूचे शेतकरी मदतीसाठी धावून आले. मात्र, हल्लेखोर अस्वलाने वरील दोघा शेतकऱ्यांसह मदतीसाठी आलेल्या अन्य ७ जणांवर हल्ला केला. या हल्ल्यात शेतकरी दत्ता बळीराम जाधव (वय ५०), चंद्रसिंग शेषेराव राठोड (वय ३०), शंकर तानाजी जाधव (वय ५०), सुदर्शन दत्ता पवार (वय ३५), पंडित जयसिंग जाधव (वय २२), विनोद शेषेराव राठोड (वय ३४), अरविंद शेषेराव जाधव (वय ३५), संजय दत्ता जाधव (वय ३५), रमेश बळीराम जाधव (वय ४५) हे जखमी झाले. तर दत्ता बळीराम जाधव यांचा मृत्यू झाला आहे. चंद्रसिंग शेषेराव राठोड, शंकर तानाजी जाधव, सुदर्शन दत्ता पवार व रमेश बळीराम जाधव हे गंभीर जखमी असून चंद्रसिंग राठोड यांची प्रकृती चिंताजनक असल्याची माहिती आहे. सर्व जखमींवर शिवणीच्या प्राथमिक आरोग्य केंद्रात प्रथमोपचार करण्यात आले. त्यानंतर त्यांना अधिक उपचारासाठी नांदेड येथे हलविण्यात आले असल्याची माहिती वैद्यकीय अधिकारी डॉ. रवींद्र टोनपे यांनी दिली. घटनेची माहिती मिळताच वनपरिक्षेत्र अधिकारी चोले, उमेश ढगे, वनपाल बी. डी. डवरे, वनरक्षक सी. पी. गडलिंगे, बी. एम. सोनकांबळे, एम. एम. पाडदे तसेच, बिट जमादार आर. के. राठोड, ओ. एल. डीडेवार, ए. व्ही. मडावी यांनी घटनास्थळी धाव घेतली. स्थानिक माजी सैनिक प्रकाश जाधव, माजी सरपंच उत्तम नानू यांच्यासह येथील ग्रामस्थांनीही बचाव कार्यात सहकार्य केले. अस्वलाने सलग नऊ जणांवर हल्ला केल्याची ही अत्यंत गंभीर घटना असून, परिसरात दहशतीचे वातावरण पसरले आहे. यापूर्वीही किनवट तालुक्यात अस्वल हल्ल्याच्या घटना घडल्या आहेत, मात्र एवढ्या मोठ्या प्रमाणात एकाच वेळी हल्ला झाल्याची घटना गंभीर मानली जात आहे.

# एकनाथ खडसे यांच्यावर गुन्हा दाखल

**मुंबई (प्रतिनिधी)–** राष्ट्रवादी शरद पवार गटाचे नेते एकनाथ खडसे यांच्याविरोधात जळगावच्या सावदा पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल झाला आहे. पोलीस निरीक्षक तसेच गृहमंत्री यांच्याबद्दल अर्वाच्य भाषा वापरत अरेरावी केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे, त्यामुळे आता एकनाथ खडसे यांच्या अडचणी वाढण्याची शक्यता आहे. गुन्हा दाखल झाल्याच्या वृत्ताला पोलीस अधिकाऱ्यांकडून दुजोरा देण्यात आला आहे.

# नांदेडमध्ये गोळीबार; एकजण जखमी, वाजेगाव बंधाऱ्याजवळील घटना

**नांदेड (प्रतिनिधी)–** शहरातील एका कुख्यात गुंडाने दुसऱ्या गुन्हेगारावर गोळीबार केला. ही घटना दि. ११ फेब्रुवारी रोजी पहाटे तीनच्या सुमारास वाजेगाव ईदगाह जवळील जुन्या पुलाजवळ घडली. या घटनेचा तपास नांदेड ग्रामीण पोलीस करत आहेत.

नांदेड शहरातील सराईत गुन्हेगारांच्या टोळ्यांवर गंभीर प्रकरणांत मोकानुसार पोलीस कारवाई करून अनेक गुन्हेगारांना पोलीस दलाने हद्दपार, स्थानबद्ध केले आहे. परंतु सराईत गुन्हेगारांच्या वर्तनात सुधारणा होताना दिसत नाही. अशाच प्रकारची फायरिंगची घटना ग्रामीण हद्दीत घडली. वाजेगाव ईदगाह परिसरातील जुन्या पुलाजवळ गुन्हेगार शेख अरबाज याच्यावर कुख्यात गुंड आवेज उर्फ अबू शूटर याने



खासगी पिस्तुलमधून गोळी झाडली. ही गोळी त्याच्या दंडावर लागून तो गंभीर जखमी झाला. त्याला तातडीने उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. त्याच्यावर अति दक्षता विभागात उपचार सुरू आहे.

हा प्रकार समजताच उपविभागीय पोलीस अधिकारी (इतवारा) प्रशांत शिंदे, नांदेड ग्रामीण ठाण्याचे पोलीस निरीक्षक ओमकार चिंचोलकर, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक उदय खंडेराव हे आपल्या पथकासह तात्काळ घटनास्थळी पोहोचले. मागील डिसेंबर महिन्यात गुन्हेगार अरबाज याच्याकडून पोलिसांनी १ पिस्तूल जप्त केले होते. आरोपी गुन्हेगार आबेज याला पकडण्यासाठी पथके तयार करून पोलीस शोध मोहीम राबवित आहेत.

वरील गुन्हेगार आवेज व अरबाज यांच्यावर नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्यात विविध गुन्हे दाखल आहेत.

# आता ‘जन गण मन’च्या आधी ‘वंदे मातरम’ गायन बंधनकारक

**मुंबई (प्रतिनिधी)–**देशभरात प्रत्येक सरकार कार्यक्रमात आता जन-गण-मन या राष्ट्रगीतापूर्वी, वंदे मातरम गायन बंधनकारक करण्यात आलं आहे. केंद्र सरकारनं हा निर्णय जाहीर केला आहे.

सरकारच्या या नव्या नियमावलीनुसार सर्व नागरिकांना राष्ट्रगीताप्रमाणेच वंदे मातरम् सुरू असेपर्यंत सावधान स्थितीत उभं राहणं बंधनकारक आहे. याशिवाय शाळांमध्येही दिवसाची सुरुवात सामूहिक ‘वंदे मातरम’ गायनाने करावी आणि विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रगीत, राष्ट्रगान आणि राष्ट्रीय ध्वजाबद्दल आदराची भावना रुजवावी हा यामागता हेतू असल्याचं सांगण्यात येतं. यावरून आता सत्ताधारी खासदारांनी निर्णयाचं समर्थन केलंय. विरोधकांनी मात्र यावरून सवाल उपस्थित केले आहेत.

याशिवाय, सरकारने विशेष आदेश दिलेल्या इतर कार्यक्रमांमध्येही हे राष्ट्रगान वाजवलं जाणार आहे. यात महत्त्वाची बाब म्हणजे जर ‘वंदे मातरम’ आणि ‘जन गण मन’ दोन्ही वाजवले जाणार असतील, तर सर्वप्रथम ‘वंदे मातरम’ वाजवलं जाईल. त्यानंतर ‘जन गण मन’ वाजवलं जाईल. या दोन्ही प्रसंगी उपस्थितांनी सावधान स्थितीत उभं राहणं बंधनकारक असेल. मात्र, एखाद्या माहितीपट किंवा न्यूज फिल्ममध्ये राष्ट्रगीताचा भाग म्हणून वाजवलं गेलं, तर उभे राहण्याची सक्ती नसेल.

# आज भारत बंदची हाक

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** १२ फेब्रुवारी रोजी देशातील अनेक संघटनांनी भारत बंदचे आवाहन केले आहे. बँक कर्मचारी संघटनांपासून ते शेतकरी संघटनांपर्यंत गुरुवारी देशव्यापी संप पुकारण्यात आला आहे.

नवीन कामगार कायदे, भारत-अमेरिका व्यापारी करार, मनरेगाचा बदल, बीव्ही-जीआरजी सारख्या मुद्यांवर देशातील कर्मचारी संघटना, शेतकऱ्यांमध्ये मोठी नाराजी आहे. या बंदमुळे बँका, सरकारी कार्यालये, सार्वजनिक वाहतूक क्षेत्र आणि बाजारावर मोठा परिणाम दिसू शकतो. या देशव्यापी संपामुळे काही राज्यात मोठा परिणाम दिसून येऊ शकतो. काही ठिकाणी शाळा आणि महाविद्यालय बंद असू शकतात.

हा संप नवीन लेबर कोड आणि भारत-अमेरिकेतली व्यापारी कराराविरोधात आहे. या नवीन बदलांमुळे देशाच्या कामगार वर्ग, अर्थव्यवस्था आणि सामान्य नागरिकांवर मोठा परिणाम होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. सरकारच्या नवीन धोरणांचा या संघटनांनी विरोध केला आहे.

# कोल्हापूरमध्ये होणाऱ्या आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियमला अजित पवार यांचं नाव दिलं जाणार

**कोल्हापूर (प्रतिनिधी)–** वझीकोल्हापूर जिल्ह्यातील करवीर तालुक्यातील विकासवाडी येथे आंतरराष्ट्रीय दर्जाचे क्रिकेट स्टेडियम उभारण्यात येणार आहे. यासाठी १२ हेक्टर ७६ आर जमीन देण्यास मंत्रिमंडळाने मंजुरी दिली आहे. कोल्हापूरच्या विकासवाडीमध्ये साकारणाऱ्या आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियमला स्वर्गीय अजित पवार यांचे नाव दिलं जाणार आहे.

कोल्हापुरातील विकासवाडी आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियम साठी कालच मंत्रिमंडळ बैठकीत १२ हेक्टर जमीन हस्तांतरित करण्याची माहिती देण्यात आली आहे. आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियम साठी प्रस्तावित जागेपेक्षा अधिकची जागा अजितदादांच्या सूचनेनुसारच दिली गेल्यानं या स्टेडियमला अजितदादांच नाव दिले जाणार आहे. जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीनंतर पालकमंत्री प्रकाश अबिटकर यांनी याबाबत माहिती दिली आहे.

# सौर ऊर्जा कृषी पंपासाठी दोन हजार रुपयांची लाच; महावितरणचा कर्मचारी एसीबीच्या जाळ्यात

**नांदेड (प्रतिनिधी)–** महावितरणच्या मागेल त्याला सौर ऊर्जा कृषी पंपअंतर्गत मंजुरीसाठी सर्व्हे करून रिपोर्ट दाखल करण्यासाठी तक्रारदाराकडून दोन हजार रुपयांची लाच घेणारा महावितरणचा कर्मचारी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या जाळ्यात अडकला आहे.

दि. १० फेब्रुवारी रोजी तक्रारदार यांनी तक्रार दिली की, त्यांच्या वडिलांचे नावे वानेगाव, ता. जि. नांदेड शिवारामध्ये शेती आहे. त्या शेतीमध्ये ‘मागेल त्याला सौर कृषी पंप योजने’अंतर्गत त्यांनी महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीकडे दि. ३० सप्टेंबर २०२५ रोजी सी.एस.सी. केंद्र वाघी, ता. जि. नांदेड येथून




ऑनलाईन अर्ज केला होता. त्याप्रमाणे शासनाने निर्धारित केलेली ऑनलाइन शुल्क त्यांनी भरणा केली होती. त्यानंतर दि. ४ फेब्रुवारी २०२६ रोजी महावितरण कंपनीकडून लिंबगाव सर्कलचे लाईनमन संतोष बोयाळ हे ऑनलाईन सर्व्हे करण्यासाठी तक्रारदारांचे शेतात आले होते.


त्यावेळी लाईनमन संतोष बोयाळ यांनी तक्रारदार यांना सांगितले की, सर्व्हे करून रिपोर्ट सबमिट करण्यासाठी इतर लाभार्थ्यांकडून ३ हजार रुपये घेत असतो, तुला पण द्यावे लागतील. त्यावेळी तक्रारदार यांनी त्यांना सर्व्हेची फीस आहे का, असे म्हणून विचारणा केली. त्यावेळी लाईनमन संतोष बोयाळ यांनी सर्व्हेची फीस नाही असे म्हणाले. त्यावेळी तक्रारदार यांनी सध्या माझ्याकडे पैसे नाहीत, नंतर देतो माझा सर्व्हे रिपोर्ट सबमिट करा असे सांगितले. तेव्हा लाईनमन संतोष बोयाळ यांनी त्यांचा सर्व्हे रिपोर्ट त्यांच्या कार्यालयास ऑनलाईन सबमिट केला. त्यानंतर दि. ४ फेब्रुवारी, दि. ५ फेब्रुवारी व दि. ६ फेब्रुवारी २०२६ रोजी लाईनमन संतोष बोयाळ यांनी तक्रारदार यांच्या मोबाईलवर फोन करून तुझे काम केलेले आहे, तरी तू आतापर्यंत मला पैसे दिले नाहीत, असे म्हणाले. तेव्हा तक्रारदार यांनी पुन्हा किती पैसे द्यावे लागतील अशी विचारणा केली असता, लाईनमन याने तडजोडअंती दोन हजार रुपये देण्याचे सांगितले. हे दोन हजार रुपये घेताना नांदेड शहराच्या अण्णाभाऊ साठे चौक परिसरात त्याला बुधवार, दि. ११ फेब्रुवारी रोजी सायंकाळच्या सुमारास रंगेहात पकडण्यात आले. त्याच्याविरुद्ध शिवाजीनगर पोलीस ठाण्यात पोलीस निरीक्षक माधुरी यावलीकर यांच्या फिर्यादीवरून गुन्हा दाखल करण्यात आला आहे.




# उस्मानगर रस्त्यावर भरधाव एसटी दुभाजकावर चढली; १२ प्रवाशी जखमी

**नवीन नांदेड (प्रतिनिधी)–** महामंडळाची नांदेड आगारातून शिरोढोणकडे जात असलेल्या भरधाव एसटी बसला उस्माननगर रस्त्यावरील गुंडेगावजवळ अपघात झाला. ही घटना मंगळवारी दि. १० रात्री ९ च्या सुमारास बस थेट दुभाजकावर चढल्याने १२ प्रवाशी जखमी झाले. यात एक महिला प्रवाशी गंभीर जखमी झाली. जखमींना तातडीने विष्णुपूरी शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले.





एसटी महामंडळाच्या नांदेड आगारातून (एमएच- १४ बीटी-२१००) ही एसटी बस मंगळवारी रात्री ८ च्या सुमाराम शिरोढोणकडे निघाली होती. रात्री ९ सुमारास वाघाळा ते उस्माननगर रस्त्यावरील गुंडेगावजवळ सदर बस थेट दुभाजकाला धडकून वर चढल्याने अपघात घडला. हे पाहताच चालक नागोराव लेंडगे व वाहक रविचंद्र पांडागळे यांना तातडीने स्थानिकांनी मदत केली आणि जखमी प्रवाशांना रुग्णालयात नेण्यात आले. या अपघातात बसमधील १२ प्रवाशी जखमी झाले, यात १ महिला प्रवाशी गंभीर जखमी झाली.

अपघाताची माहिती मिळताच ग्रामीण पोलीस हवालदार मारोती माने यांनी भेट देऊन माहिती घेतली. सध्या बस चालकासमवेत अपघाताच्या कारणांची चौकशी सुरू आहे. दरम्यान महामंडळाकडून अपघातात जखमी झालेल्या प्रवाशांना उपचारासाठी प्रत्येकी १ हजार रूपयांची तातडीची मदत केली. तर उपचारानंतर प्रवाशांना घरी सोडण्यात आले, असे नांदेड आगाराचे प्रमुख मिलिंद सोनाळे यांनी सांगितले.

# भरतीसाठी आलेल्या तरुणाचा मैदानावरच अखेरचा श्वास

**बीड (प्रतिनिधी)–** बीडमध्ये सुरू असलेल्या पोलीस भरती प्रक्रिये दरम्यान एका उमेदवाराचा दुर्दैवी मृत्यू झाल्याचं समोर आलं आहे. दीपक भास्कर व्हावळ असे या उमेदवार तरुणाचे नाव असून अस्वस्थपणामुळे मृत्यू झाल्याचं कारण सांगितले जात आहे.

बीड जिल्हा पोलीस दलात १७४ पदांसाठी ८१३४ उमेदवार भरती प्रक्रियेत सहभागी आहेत. आज पहाटेपासून या भरती प्रक्रियेला सुरुवात झालीय. दुपारच्या सुमारास मैदानी चाचणी सुरू असताना या उमेदवाराचा मैदानावरच दुर्दैवी मृत्यू झालाय. अचानक झालेल्या या घटनेनं अनेकांना मात्र जबर धक्का बसला असून परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. दरम्यान, शवविच्छेदनासाठी उमेदवाराचा मृतदेह जिल्हा रुग्णालयात नेण्यात आला असून शवविच्छेदन अहवालानंतर मृत्यूचे कारण कळू शकणार आहे. परंतु अनेक स्वप्न उराशी बाळगून पोलीस भरती प्रक्रियेत सहभागी झालेल्या तरुणाच्या दुर्दैवी मृत्यूने हळहळ व्यक्त केली जाते.

बीड जिल्हा पोलिस दलात रिक्त १७४ पदांसाठी आजपासून भरती प्रक्रियेला सुरुवात झाली. १८ तारखेपर्यंत ही प्रक्रिया पार पडणार असून आठ हजारांहून अधिक उमेदवारांनी अर्ज दाखल केले आहेत. मैदानी चाचणी आणि लेखी परीक्षा पारदर्शी करिता जिल्हा पोलीस दल वरिष्ठ अधिकारी प्रयत्नशील आहेत.


अशातच, या भरती प्रक्रियेदरम्यान कोणत्याही उमेदवारावर अन्याय होणार नाही, संपूर्ण प्रक्रिया पारदर्शकपणे पार पडावी याकरिता अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केला जात आहे. यामध्ये धावण्याच्या चाचणीकरिता फोटो फिनीश हे जागतिक स्तरावरील स्पर्धांमध्ये वापरले जाणारे तंत्रज्ञान उपलब्ध करण्यात आलेले आहे.

जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे
शहाणे करूनी सोडावे, सकळ जन
संस्थापक संपादकः
कै. देविदासराव रसाळ
गोदातीर समाचार
संपादक
केशव घोणसे पाटील

# महाराष्ट्राची बदलती राजकीय दिशा

महाराष्ट्राच्या राजकारणात नुकत्याच पार पडलेल्या जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकांनी एक महत्त्वाचा राजकीय संदेश दिला आहे. लोकसभा, विधानसभा, महानगरपालिका, नगर परिषद यांतील यशानंतर आता ग्रामीण सत्ताकेंद्रांवरही भाजपप्रणीत महायुतीने आपले वर्चस्व प्रस्थापित केले आहे. एकेकाळी काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसचा बालेकिल्ला मानल्या जाणाऱ्या ग्रामीण व निमशहरी भागात झालेला हा बदल केवळ आकड्यांचा खेळ नसून, तो बदलत्या मतदार मानसिकतेचे आणि नव्या राजकीय संरचनेचे द्योतक आहे. या निवडणुकांत भाजप पहिल्या क्रमांकावर राहिली असून, त्यापाठोपाठ शिंदे गटाची शिवसेना आणि अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचा क्रम लागतो. दुसरीकडे विरोधी आघाडीत काँग्रेसने सर्वाधिक जागा जिंकल्या असल्या तरी एकत्रित प्रभाव निर्माण करण्यात ती अपयशी ठरली आहे. ठाकरे गटाची शिवसेना आणि शरद पवारांची राष्ट्रवादी काँग्रेस यांचे स्थान त्यानंतर लागते. ही स्थिती स्पष्टपणे दाखवते की, विरोधकांकडे आजही जनाधार आहे; मात्र तो सत्तांतर घडवून आणण्यासाठी पुरेसा संघटित नाही. महायुतीच्या यशामागे अनेक कारणे आहेत. भाजपने गेल्या काही वर्षांत ग्रामीण आणि प्रादेशिक राजकारणात जी सूत्रबद्ध मांडणी केली, त्याचा प्रभाव या निकालांत स्पष्टपणे दिसतो. विकासाचे राजकारण, 'त्री-सरकार', म्हणजे केंद्र, राज्य आणि स्थानिक स्वराज्य संस्था, या संकल्पनेतून दिलेले आश्वासन, तसेच 'लाडकी बहीण'सारख्या थेट लाभ देणाऱ्या योजनांचा परिणाम ग्रामीण मतदारांवर झाला आहे. केवळ घोषणांपुरते मर्यादित न राहता, योजनांची अंमलबजावणी जमिनीवर दिसल्याने सत्ताधारी आघाडीला फायदा झाला. प्रादेशिक निकालांकडे पाहिले तर कोकणात महायुतीने दमदार कामगिरी केली आहे. रायगडमध्ये शिवसेना (शिंदे), भाजप आणि अजित पवार गटाने चांगले यश मिळवले. रत्नागिरीत शिंदे गटाला मोठा फायदा झाला, तर सिंधुदुर्गमध्ये भाजपने आपले वर्चस्व सिद्ध केले. दुसरीकडे मराठवाड्यातील लातूर जिल्हा परिषदेत काँग्रेसने चांगली कामगिरी करून आपले अस्तित्त्व टिकवले आहे. विशेष म्हणजे महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने मराठवाड्यात तीन जागा जिंकून अनपेक्षित प्रवेश केला असला तरी राज्याच्या इतर भागांत तिची उपस्थिती अजूनही नगण्य आहे. या निवडणुकांपूर्वी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या आकस्मिक निधनामुळे निवडणुका स्थगित करण्यात आल्या होत्या. त्यामुळे मतदानाच्या टक्केवारीकडे सर्वांचे लक्ष लागले होते. १२ जिल्ह्यांत सरासरी ६८ टक्के मतदान नोंदवले गेले, तर काही जिल्ह्यांत ७० टक्क्यांहून अधिक मतदान झाले. हे प्रमाण पाहता, निवडणुका स्थानिक कार्यकर्त्यांच्या ताकदीवर आणि प्रत्यक्ष संपर्कावर अवलंबून असतात, हे पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे. जिल्हा परिषद आणि पंचायत समित्या मोठ्या प्रमाणावर राज्य सरकारवर अवलंबून असतात. त्यामुळे सत्ताधारी पक्षाच्या बाजूने मतदान होण्याची प्रवृत्ती अधिक दिसते. यापूर्वी काँग्रेस-राष्ट्रवादी काँग्रेसचे सरकार असताना या संस्थांमध्ये त्यांना यश मिळाले होते. २०१४ मध्ये देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्त्वाखाली भाजप-शिवसेना सरकार सत्तेत आले, तेव्हा त्यांच्या नेतृत्त्वावर प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात आले होते. मात्र, नंतरच्या ग्रामपंचायत आणि जिल्हा परिषद निवडणुकांमध्ये त्यांनी चांगले यश मिळविले. आज महायुतीकडे केंद्र, राज्य आणि अनेक स्थानिक स्वराज्य संस्था यांची सत्ता आहे. मात्र, या विजयाचा अर्थ विरोधक संपले आहेत असा नाही. उलट, या निकालांनी विरोधकांसमोर आत्मपरीक्षणाची संधी उभी केली आहे. या निवडणुकांचे निकाल महाराष्ट्राच्या राजकारणातील बदलती दिशा दाखवतात. सत्ताधाऱ्यांसाठी हा आत्मविश्वास वाढवणारा टप्पा असला, तरी तो जबाबदारीची जाणीव करून देणारा आहे. ग्रामीण भागातील अपेक्षा मोठ्या आहेत आणि त्या पूर्ण करण्यातच खरे राजकीय यश दडलेले आहे. सत्ता टिकवायची असेल, तर निवडणूक जिंकण्याइतकेच महत्त्व जनतेचा विश्वास जपण्यात आहे.

# उत्क्रांतीवादाचा जनक : चार्ल्स डार्विन



उत्क्रांती वादाचा जनक असे ज्यांना समजले जाते त्या चार्ल्स रॉबर्ट डार्विन यांचा आज जन्मदिन. चार्ल्स डार्विन हे विख्यात जीवशास्त्रज्ञ होते. त्यांनी मांडलेल्या उत्क्रांतीवादाच्या सिद्धांतात जगातील जीवसृष्टीची उत्पत्ती व विकासाची कशी प्रगती होत गेली हे शास्त्रशुद्धरित्या उलगडून दाखवले. चार्ल्स डार्विन यांचा जन्म १२ फेब्रुवारी १८०९ रोजी इंग्लंडमधील श्रॉपशायर परगण्यात झाला.त्यांचे वडील रॉबर्ट डॉक्टर तर आजोबा इमर्सन शास्त्रज्ञ होते.

शालेय जीवनात त्यांना रसायन शास्त्राची खूप आवड होती म्हणून आपल्या भावाच्या मदतीने त्यांनी आपल्या घराबाहेर एक छोटीशी प्रयोगशाळा उभारली होती तिथे ते तासनतास प्रयोग करीत बसत. ते असे एकाच जागेवर तासनतास प्रयोग करीत बसत असल्याने मित्र मंडळी त्यांची नेहमी टर उडवत पण ते त्याकडे कायम दुर्लक्ष करीत. त्यांना निसर्गाचीही खूप आवड होती. पुढे त्यांची डॉ. ग्रांट यांच्याशी ओळख झाली.

डॉ ग्रांट हे स्वतः प्रसिद्ध जीव शास्त्रज्ञ होते. १८२५ मध्ये डार्विन यांनी केंब्रिज विद्यापीठाच्या क्राईस्ट महाविद्यालयात नाव नोंदवून पदवी मिळवली. तिथे त्यांना कीटक व निसर्गातील जीव जिवाणूंच्या निरीक्षणाचा नाद लागला. १८२६ मध्ये कॅप्टन किंगने दक्षिण अमेरिका संशोधनाची मोहीम आखली त्यात ते सहभागी झाले. त्या मोहिमेवर ते पाच वर्ष होते. तिथे त्यांनी निरनिराळे पक्षी, प्राणी, कीटक, जीवजंतू एकमेकांशी कसे वागतात. ते एकमेकांशी आणि निसर्गाशी कसे जुळवून घेतात याचे निरीक्षण आणि अभ्यास केला व तेथे उत्क्रांतीवाद, सहजीवन, बळी तो कान पिळी ही मूलभूत नैसर्गिक तत्वे ते शिकले.

या दरम्यान माणसाचा मूळ पुरुष, चार पायी माकडपासून झाला असला पाहिजे असा विचार त्यांच्या डोक्यात घुमू लागला. त्यांनी याचे खूप संशोधन केले. वेगवेगळे प्राणी कसे निर्माण झाले यासंदर्भातही त्यांनी खूप संशोधन केले. या संशोधनावर आधारित ओरिजन ऑफ स्पेसिस हा ग्रंथ त्यांनी लिहिला. या ग्रंथातच त्यांनी उत्क्रांतवादाचा सिद्धांत मांडला आहे. या ग्रंथाच्या १२५० प्रति एकाच दिवसात विकल्या गेल्या. या ग्रंथामुळे त्यांचे सर्वत्र त्यांचे नाव झाले. या ग्रंथात त्यांनी मांडलेला उत्क्रांतीवादाचा सिध्दांत बायबलच्या विरुद्ध जात होता म्हणून अनेकांनी या सिद्धांताला विरोध केला. हा सिद्धांत बायबलच्या विरुद्ध जातो म्हणून त्याचा निषेध करण्यासाठी १८६० मध्ये ऑक्सफर्डमध्ये विलबर फोर्स या बिशपने सभा बोलावली.

डार्विन यांचा एकीकडे पुरोगामी विचारांचे लोक समर्थन करीत होते दुसरीकडे प्रतिगामी लोक विरोध करीत होते. पण या सर्व घडामोडींचा डार्विन यांच्यावर कोणताही परिणाम होत नव्हता त्यांचे संशोधन चालूच होते. बिशप डार्विनला कडाडून विरोध करीत असताना हक्सले डी हुकर हे शास्त्रज्ञ मात्र डार्विन यांची बाजू सडेतोड व सोदाहरण मांडत होते. त्यामुळे उत्क्रांतीवादाच्या सिद्धांताला कडाडून विरोध करणाऱ्या बिशपला अखेर माघार घेऊन डार्विनचा सिद्धांत मान्य करावाच लागला.

**-श्याम ठाणेदार**
दौंड, जि. पुणे
मो. ९९२२५४६२९५

# चला संघर्षाच्या गावाला जाऊ...

असे म्हणतात की,अपयशाचे कडू डोस पिल्याशिवाय किंवा पिऊन ते पचवल्याशिवाय यश नावाची आपल्याला सहज हवी हवीशी गोष्ट प्राप्त होत नाही.. प्रत्येकाला यश पाहिजे असते पण त्यासाठी करावा लागणारा संघर्ष किंवा प्रयत्न करण्याची कुणाचीच तयारी असत नाही..अर्थात यालाही काही बोटावर मोजण्याइतके अपवाद असतील पण जेव्हा आपण आपला इतिहास पाहतो, तेव्हा आपल्या लक्षात येते, की ज्याने कुणी यश प्राप्त केले आहे, त्याला संघर्षाच्या काटेरी मार्गावरून जाऊनच, यश नावाच्या गुलाबाचा सुगंध घेता आला. अर्थातच संघर्ष कुणालाच टाळता आलेला नाही.



स्वातंत्र्य पूर्वीचा भारत व स्वातंत्र्यलढ्यात आपल्या प्राणाची आहुती देणारे सर्व भारत मातेचे पुत्र, वीर बलिदानी, यांनी इंग्रजांना भारताच्या बाहेर हाकलून लावण्यासाठी, पराकोटीचा विविध प्रकारचा संघर्ष केला,त्यांनी इंग्रजा विरोधात दीडशे वर्ष संघर्ष करून, लढा देऊन,आपल्याला इंग्रजांच्या गुलामीतून मुक्त करून हे स्वातंत्र्य नावाचे फळ चाखायला दिले.. अर्थातच यशाची फळे चाखायचे असतील, तर माणूस नावाच्या झाडाला ऊन, वारा आणि पाऊस यांच्याशी संघर्ष करावाच लागतो...

छत्रपती शिवरायांना सुद्धा हिंदवी स्वराज्य निर्माण करण्यासाठी मुघलांसोबत लढा द्यावा लागला, कठोर संघर्ष करावा लागला.. त्यांनी अखंड संघर्षाच्या, प्रयत्नाच्या, संयमाच्या आणि जिद्दीच्या जोरावर, शून्यातून हिंदवी स्वराज्य निर्माण केले व आपल्यापुढे संघर्षाचे अप्रतिम उदाहरण ठेवले आहे..

त्यांचा हा पराकोटीचा संघर्ष, आपल्याला
कितीही प्रतिकूल परिस्थिती असेल, तरी नव्या जोमाने लढायला प्रेरणा देतो..सोबतच

संतांचा काळ तर संघर्षाचा काळ म्हणून ओळखला जातो. आपल्या इतिहासात आपल्याला विविध प्रकारच्या गोष्टींसाठी विविध संघर्ष झालेले दिसून येतात, त्यात कुणी जातीपाती विरोधात संघर्ष केला, तर कुणी वर्ण द्वेष विरोधात, कुणी विषमते विरोधात, तर कुणी अन्यायग्रस्त समाजाला, योग्य न्याय मिळवून देण्यासाठी. संघर्षाचे प्रमाण भलेही कमी अधिक असेल, त्याचे स्वरूपही वेगळे असेल पण संघर्ष कुणालाही टळला नाही..

कुणाच्याही अस्तित्वाची नोंद सहजासहजी
कुठल्याच काळात, कुणीच घेतलेली दिसून येत नाही..पण ज्यांनी प्रतिकूल परिस्थितीशी दोन हात करून, आपल्या अस्तित्वाची झलक दाखवली किंवा आपले पाय जमिनीवर घट्ट रोऊन, परिस्थितीशी निकराने लढा देऊन, काळाच्या पडद्यावर आपले अखंड अस्तित्व निर्माण केले, जगाने त्यांच्या अस्तित्वाची नोंद घेतली आहे.. माणसाला आपली प्रतिमा उजळ करायची असेल, तर त्याला प्राप्त परिस्थितीशी लढण्याएवढा, दुसरा कुठलाच रामबाण उपाय नसून, तोच एकमेव मार्ग माणसाला आपल्या स्वतःचे अस्तित्व निर्माण करण्यासाठी उपयोगाचा ठरतो.. प्रतिमा त्यांचीच निर्माण होते,ज्यांनी संघर्षाच्या काटेरी मार्गावरून प्रवसा केलेला असतो.. अनेक लढव्या लोकांचा इतिहास, आपल्याला आजही तेवढ्याच जिद्दीने लढण्याची प्रेरणा देत असतो.. किंबहुना पुढच्या पिढीला, लढव्या लोकांचे अनुभव लढायला बळ देत असतात...

देरे हरी पलंगावरी या उक्तीनुसार, जाग्यावर बसून कुणालाही काही मिळालेले नाही व मिळत सुद्धा नाही. जमिनीमध्ये जेव्हा आपण बीज पेरतो, तेव्हा त्यातून उगवून येणाऱ्या रोपट्याला सुद्धा ऊन, वारा आणि पाऊस यांच्यासोबत संघर्ष करूनच आपले अस्तित्व निर्माण करावे लागते.. अर्थातच संघर्षाचा शिवधनुष्य ज्याने ज्याने लीलया पेलला आहे, त्याला त्याला यशाचा मार्ग गवसला आहे. खरे पाहता यशाचा मार्ग हा 'काटेरी मार्ग असतो व वाटेतील काट्यांशी संघर्ष करूनच,कुणालाही आपल्या अस्तित्वाचा किनारा गाठता येतो..

असे म्हणतात की,
अगर इरादे बुलंद हो,
तो रास्ते मिलते है,
अगर इरादे कच्चे
हो, तो बहाने निकलते है

वरील ओळींना समर्पक दाखला म्हणून,

कुठल्यातरी राजाने त्याच्या लढाईत पराभूत होण्याचे कारण असे सांगितले होते, की त्याच्या एका हातात तलवार आणि दुसऱ्या हातात ढाल असल्यामुळे, तो त्याच्या समोरील शत्रूसोबत लढू शकला नाही व त्याचा पराभव झाला.. आपणाला असे निरर्थक कारण देऊन चालणार नाही... जगण्याच्या लढाईत आपणाला केवळ कारणांच्या कुबड्यांचा आधार घेऊन ही लढाई आपण जिंकू शकणार नाही, तर संघर्षाच्या हातात हात देऊन, आपल्याला बिकट परिस्थितीशी दोन हात करता यायला हवे, तरच आपल्याला आपले ठरवलेले निश्चित यश नक्कीच मिळेल...

आजचा काळ आणि त्याची जटीलता पाहता मनात यश प्राप्तीच्या केवळ इच्छांचे बीज पेरून, यशाचे पीक उगवणार नाही, तर अतिशय प्रतिकूल परिस्थितीवर, तितक्याच ताकदीने प्रयत्न रुपी संघर्षाचा मारा करून, किंबहुना यश प्राप्तीच्या अवघड किनाऱ्याला, प्रयत्नांच्या धडकावर धडका मारूनच आपली यश मिळवण्याची शक्यता गडद होऊ शकते...बाकी संघर्ष कुणालाच टळला नव्हता, टळत नाही व टळणार सुद्धा नाही हे मात्र नक्की...

चला संघर्षाच्या गावाला जाऊ,
संघर्षाने आपले अस्तित्व
निर्माण करु , चला आपल्या
स्वप्नांना मूर्त रूप देऊ..
चला संघर्ष करून तर पाहू...

**-प्रा. अमित शिंदे**
मु. पो. रोहीपिंपळगाव.
ता. मुदखेड, जि. नांदेड
मो. ९७६७८५१०४६

# राज्यात निसर्ग मित्र गिधाडांची घटती संख्या चिंताजनक



राज्यात एका सर्वेक्षणात लक्षात आले की, गिधाडांची संख्या फक्त २०० इतकीच राहिली आहे. ही बाब राज्यासाठी व संपूर्ण जीवसृष्टीसाठी अत्यंत गंभीर व चिंताजनक बाब आहे. राज्यात शुभ्र पांढरे, लांब आणि बारीक चोचीचे गिधाड आढळतात. गडचिरोली जिल्ह्यात यांची संख्या सर्वाधिक आहे. या खालोखाल नाशिक, पेंच, चंद्रपूर, रोहा, कोल्हापूर आणि कोकणातही गिधाडांची नोंद आढळते. या पद्धतीने राज्यातील गिधाडांचा विचार केला तर अत्यल्प असून, २०० वर येवून ठेपल्याचे सांगितले जाते. तीन वर्षांपूर्वी ही संख्या २५० इतकी होती असे सांगितले जाते. परंतु ही संख्या कमी होत असल्याने चिंता वाढली आहे. निसर्गाची जीवनसाखळी एकमेकांवर अवलंबून असते. या साखळीत गिधाडांचे स्थान अत्यंत महत्त्वाचे आहे.

गुजरात, हरियाणा, उत्तराखंड व हिमाचल प्रदेश हे यांच्या अस्तित्वाचे मुख्य प्रदेश आहेत. गुरांना देण्यात येणाऱ्या डायक्लोफिनॅक औषधामुळे गिधाडांचा सर्वात जास्त मृत्यू होत आहे. यासोबतच मलेरियामुळे राज्यात गिधाडांचे मृत्यू झाल्याचे एनएडब्ल्यूएआरचे संशोधन सांगतो. राज्याप्रमाणे देशाचा विचार केला तर देशात दिवसेंदिवस सर्वच स्तरातून प्रदूषण मोठ्या प्रमाणात वाढत आहे. अत्याधुनिक साधनसामग्री, कारखाने, जंगल तोड, वाढते औद्योगिकीकरण यांमुळे आकाश-पाताळ -पृथ्वी-निसर्ग-समुद्र पूर्णपणे अत्यंत कठीण परिस्थितीमध्ये येऊन ठेपला आहे. यामुळे सर्वत्र मोठ्या प्रमाणात प्रदूषण दिसून येते. मृत जनावरांचे मांस खाऊन निसर्गाचे संतुलन सुरक्षित ठेवण्याचे काम मुख्यत्वेकरून गिधाडांचे आहे. त्यामुळे गिधाड आपली भूमिका चोखपणे बजावून निसर्ग निरोगी ठेवून पृथ्वीचे रक्षण गिधाड करायचे व करीत आहे. त्यामुळे त्यांना निसर्गातील स्वच्छता दूत सुध्दा म्हणतात. परंतु राज्यासह देशासाठी धक्कादायक बातमी म्हणजे भारतातील ९० टक्के गिधाडांची संख्या घटल्याने भारतीय निसर्गावर मोठे संकट आल्याचे दिसून येते. यासाठी आजच्या परिस्थितीत गिधाडांना वाचवीने काळाची गरज आहे. याकरिता पर्यावरणाचा मुख्य घटक म्हणून गिधाडांची आ-ळख आहे. परंतु त्यांची घटती संख्या पाहता त्यांचे संवर्धन होवून संख्या वाढविण्याच्या दृष्टीकोनातून दरवर्षी सप्टेंबर महिन्यातील पहिला शनिवार आंतरराष्ट्रीय गिधाड संवर्धन दिन म्हणून पाळला जातो.

गिधाडांना मृत्यूच्या खाईत लोटण्याचे काम बुद्धिजीवी मानवजातीनेच केले आहे. भारतात ६ भारतीय व ३ स्थलांतरित अशा ९ प्रजातीच्या गिधाडांचे अस्तित्व आहे. १९८० च्या दशकापर्यंत देशात गिधाडांची संख्या ४० दशलक्षपेक्षा जास्त होती. मात्र डायक्लोफेनॅक सारख्या विषारी औषधांमुळे अवघ्या १५-२० वर्षात ९० टक्के गिधा-डे संपली. त्यामुळे सध्याच्या परिस्थितीत भारतात १९ हजार तर महाराष्ट्रात फक्त २०० गिधाड असल्याचे सांगितले जाते. काही प्रजाती तर नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत.त्यामुळे मृत जनावरांचे मांस खाऊन निसर्गाचे संतुलन निरोगी ठेवणाऱ्या या निसर्ग मित्रालाच आता वाचविण्याची वेळ आली आहे. २५-३० वर्षापूर्वी गिधाड मृत जनावरांचे जे मांस खायचे ते त्यांना पोषक व आहार युक्त होते. परंतु आधुनिक युगात गेल्या काही वर्षांपासून जनावरांना अनेक रोगांपासून वाचविण्यासाठी वेगवेगळ्या प्रकारची औषधे व इंजेक्शन देऊन त्यांचे प्राण वाचवले जाते. काही जनावरांना प्रजननासाठी व दुधाची मात्रा वाढविण्यासाठी मोठ्या प्रमाणात औषधांचा व इंजेक्शनचा वापर होताना दिसतो व होत आहे. परंतु यांचा विपरीत परिणाम निसर्ग संरक्षक गिधाड याला भोगावा लागत आहे. कारण जी औषधे जनावरांना देण्यात येते ती औषधे जनावरे मृतपावल्यानंतर संपूर्ण जनावरे विषेली होतात. ही मृत जनावरे गिधाड खातात व त्यांना अनेक रोगांच्या यातना भोगून मृत्यूशी झुंज द्यावी लागते. यामुळेच आज निसर्ग मित्र गिधाड यांची संख्या ९० टक्याने घटल्याचे दिसून येते. ही अत्यंत चिंतेची आणि गंभीर बाब आहे.

एका माहितीनुसार १९९३ ते २००७ दरम्यान भारतीय प्रजाती असलेल्या पांढऱ्या पुठ्याचे गिधाडांची संख्या ९९.९ टक्के नष्ट झाली आहे. याशिवाय भारतीय गिधाड व निमुळत्या चोचीचे गिधाड या प्रजातींची ९९ टक्के संख्या कमी झाली आहे. म्हणजेच निसर्ग सुरक्षित ठेवण्याच्या दृष्टीने गिधाडांची संख्या कमी होने अत्यंत चिंताजनक बाब आहे. त्यामुळे गिधाडांच्या बहुतेक प्रजाती नामशेष होण्याची भीती पहाता. भारतीय निसर्ग मित्राला वाचविण्याची काळाचीगरजआहे. २०२०ते२०२५पर्यंतच्या भारतातील गिधाड संवर्धनाच्या कृती आराखड्यानुसार भारतीय गिधाड फाउंडेशनच्या सहकार्याने महाराष्ट्र वनविभाग गिधाड संवर्धन प्रजनन केंद्रे स्थापन करण्यासाठी प्रयत्न करणार आहे. त्याचप्रमाणे ताडोबा-अंधारी व्याघ्रप्रकल्प व बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटी यांच्या संयुक्त विद्यमाने जटायू संवर्धन केंद्राची निर्मिती करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे पिंजोरा (हरियाणा) येथील गिधाड प्रजनन व संशोधन केंद्राने गिधाडांची संख्या वाढविण्यावर भर देत आहेत.ही अत्यंत आनंदाची बाब आहे याचे स्वागतच.

देशातील गिधाडांची घटती संख्या पाहता राज्य सरकार व केंद्र शासीत प्रदेशातील वनविभागाने गिधाडांना वाचवीन्यासाठी युद्ध-पातळीवर प्रयत्न करण्याची नितांत गरज आहे. आज आपण पहातो गिधाडच काय तर घार सारखे महाकाय पक्षी सुध्दा डोळ्यांनी दिसत नाही. अशाप्रकारे असे अनेक पशुपक्षी आहे ते लुप्त झाले आहेत किंवा लुप्त होण्याच्या मार्गावर आहेत ही अत्यंत गंभीर व चिंताजनक बाब आहे.निसर्गाचे संतुलन बिघडल्याने पशुपक्षीच काय तर अनेक औषधी युक्त वनस्पती नामशेष झाली आहे किंवा नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत. त्यामुळे बुद्धिजीवी मानवाने लक्षात ठेवले पाहिजे की, या पृथ्वीतलावरील प्रत्येक वस्तू, जीवजंतू, पशुपक्षी व वनस्पती या सर्वच एकमेकांशी निगडित आहे. त्यामुळे आज निसर्गमित्र गिधाडांचे संवर्धन करणे गरजेचे आहे सोबतच निसर्ग वाचविणे तेवढेच आवश्यक आहे. यामुळे निसर्ग प्रफुल्लित राहण्यास मोठी मदत होईल व सोबतच प्रदूषणावर सुध्दा मात करण्यास आपल्याला यश प्राप्त होईल.

**-रमेश लांजेवार**
नागपूर
मो. ९९२१६९०७७९

# मुलांचे भविष्य आणि सोशल मीडिया : स्वातंत्र्य की संरक्षण?

आजचे जग वेगाने डिजिटल होत आहे. स्मार्टफोन, इंटरनेट आणि सोशल मीडिया हे आधुनिक जीवनाचे अविभाज्य घटक बनले आहेत. माहिती, शिक्षण, संवाद आणि मनोरंजन या सर्व गोष्टी आता एका स्क्रीनवर उपलब्ध आहेत. मात्र, या डिजिटल सुलभतेच्या झगमगाटामागे एक गंभीर वास्तव दडलेले आहेते म्हणजे लहान मुलांचे असुरक्षित होत चाललेले मानसिक, भावनिक आणि सामाजिक आयुष्य. मद्रास उच्च न्यायालयाने १६ वर्षांखालील मुलांसाठी सोशल मीडियावर बंदीचा कायदा करण्याचा विचार केंद्र सरकारने करावा, अशी केलेली सूचना या पार्श्वभूमीवर अत्यंत महत्त्वाची आणि विचार करायला लावणारी आहे.

आज भारतात १४ ते १६ वयोगटातील ८२ टक्के मुले स्मार्टफोन वापरत आहेत आणि त्यापैकी ७६ टक्के मुले सोशल मीडियावर सक्रिय आहेत, हे आकडे केवळ आकडेवारी नाहीत; ती एक सामाजिक चेतावणी आहे. बालपण म्हणजे खेळ, संवाद, निसर्गाशी नाते आणि भावनिक वाढीचा काळ. मात्र, हे बालपण आता 'स्क्रीन टाइम'मध्ये अडकत चालले आहे. दररोज तीन तासांपेक्षा जास्त वेळ ऑनलाइन घालवणारी मुले हळूहळू वास्तवापासून दूर जात आहेत. अधीरता, राग, आळस, एकाकीपणा यांसारख्या भावना त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा भाग बनत असल्याचे पालकही मान्य करत आहेत.

प्रौढ व्यक्तीसाठी इंटरनेटवरील सामग्री पाहायची की नाही, हा वैयक्तिक अधिकार असू शकतो. मात्र, मुलांच्या बाबतीत तोच निकष लावणे धोकादायक ठरते. मुलांची मानसिक जडणघडण अजून पूर्ण झालेली नसते. अशा अवस्थेत पोर्नोग्राफिक सामग्री, हिंसक व्हिडीओ, ड्रग्ज, तंबाखू यासारखी माहिती सहज उपलब्ध होणे म्हणजे त्यांच्या मनावर खोल परिणाम होण्याची शक्यता निर्माण करणे. मद्रास उच्च न्यायालयाने 'गेटकीपिंग'च्या अभावाकडे बोट दाखवून हीच गंभीर बाब अधोरेखित केली आहे. अलीकडील काळातील शालेय घटनांमधून मुलांमध्ये आत्महत्येच्या प्रवृत्तीत वाढ होत असल्याचे दिसून येते. सोशल मीडियावर सतत तुलना, अपेक्षांचा दबाव, ट्रोलिंग, सायबर बुलिंग आणि 'परफेक्ट आयुष्य'चे खोटे चित्र यामुळे मुलांचे आत्मभान ढासळते. अपयश स्वीकारण्याची ताकद कमी होते. ही केवळ वैयक्तिक समस्या न राहता सामाजिक संकट बनत आहे. अशा वेळी 'कायदा नको, फक्त जागरूकता पुरेशी आहे' असे म्हणणे वास्तवाशी फारकत घेणारे ठरू शकते.

ऑस्ट्रेलियाने लागू केलेला 'ऑनलाइन सुरक्षा सुधारणा कायदा २०२४' हा जगासाठी एक महत्त्वाचा संदर्भ ठरतो. १६ वर्षांखालील मुलांसाठी सोशल मीडियावर बंदी घालून, उल्लंघनाची जबाबदारी थेट सोशल मीडिया कंपन्यांवर टाकण्यात आली आहे. मुलांना किंवा पालकांना गुन्हेगार ठरवण्याऐवजी, 'वय पडताळणी'सारखी तंत्रज्ञाने वापरण्याची जबाबदारी कंपन्यांवर देण्यात आली आहे. हा दृष्टिकोन शिक्षात्मक नसून संरक्षणात्मक आहे, आणि म्हणूनच तो अधिक परिणामकारक ठरू शकतो.

भारतासारख्या देशात, जिथे १६ वर्षांखालील मुलांची संख्या सुमारे ३५ कोटी आहे, तिथे हा प्रश्न अधिक व्यापक आणि गुंतागुंतीचा आहे. केवळ बंदी पुरेशी ठरणार नाही. कायद्याबरोबरच पालकांसाठी डिजिटल साक्षरता, शाळांमधून इंटरनेट सुरक्षिततेचे शिक्षण, पालक विंडो आणि कंटेंट फिल्टरिंग आणि सोशल मीडिया कंपन्यांची कठोर जबाबदारी. या सर्व बाबी एकत्रितपणे राबवाव्या लागतील. मुलांचे स्वातंत्र्य महत्त्वाचे आहे, पण त्याहून महत्त्वाचे आहे त्यांचे संरक्षण. आज घेतलेले निर्णय उद्याच्या पिढीचे मानसिक आरोग्य, मूल्यव्यवस्था आणि सामाजिक भान ठरवणार आहेत. मद्रास उच्च न्यायालयाने व्यक्त केलेली भूमिका ही केवळ न्यायालयीन टिप्पणी नसून समाजाला आरसा दाखवणारी आहे. 'डिजिटल भारत' घडवताना 'सुरक्षित बालपण' हरवू नये, हीच खरी कसोटी आहे. त्यामुळे आता प्रश्न असा नाही की कायदा करावा की नाही; प्रश्न असा आहे की, आपण आपल्या मुलांसाठी जबाबदार समाज म्हणून उभे राहणार आहोत का?

**-मच्छिंद्र ऐनापुरे,**
जत

## थोडक्यात...

### शिवजन्मोत्सवानिमित्त नांदेड येथे ॲड.सचिन मगर यांचे व्याख्यान

**नांदेड (प्रतिनिधी)–** महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, आगार राष्ट्रीय पुरुष जयंती मंडळ कर्मचारी अधिकारी



शिवजन्मोत्सव सोहळा २०२६ नांदेड आगार येथे १९ फेब्रुवारी रोजी एस. टी. बसस्टॅन्ड, नांदेड येथे संपन्न होणार आहे. या कार्यक्रमासाठी प्रमुख वक्ते म्हणून ॲड. सचिन मगर यांचे व्याख्यान आयोजित केले आहे. या कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून मिलिंदकुमार सोनाळे विभागीय वाहतूक अधिक्षक, नांदेड व प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. चंद्रकांत वडस्कर व प्रमुख अतिथी म्हणून अभिजित कोरटकर, कमलेश बा. भारती, गोविंद मुळे, श्रीमती वंदना चापोलीकर, रविकुमार कवडे, यासिन खान, सतीश गुंजकर यांची उपस्थिती राहणार आहे. एसटी कर्मचारी व समाजबांधवांनी जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

### नांदेडचा वाळूमाफिया हर्सुल कारागृहात स्थानबद्ध

**नांदेड (प्रतिनिधी)–** शासनाचा महसूल बुडवत वाळू माफिया जिल्ह्यात सक्रिय झाले आहेत. अशाच एका वाळू माफियाविरुद्ध नांदेड ग्रामीण पोलिसांच्या प्रस्तावावरून पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांच्या शिफारशीनुसार जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी एक वर्षासाठी छत्रपती संभाजीनगर येथील हर्सुल कारागृहात त्याची रवानगी केली आहे. यामुळे अन्य वाळू माफियामध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे.

जिल्ह्यातील अवैध वाळू तस्करीस आळा घालण्यासाठी पोलीस प्रशासन व महसूल प्रशासनाकडून सतत विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. या मोहिमेदरम्यान अवैध वाळू उपसा व विक्री करणाऱ्या गुन्हेगारी प्रवृत्तीच्या व्यक्तीविरुद्ध कठोर कारवाई करण्यात येत आहे.

# लोकसेवा हक्क अधिनियमांतर्गत नागरिकांना वेळेत सेवा द्या –आयुक्त डॉ. किरण जाधव

## सर्व विभागांनी सेवा ऑनलाईन करण्यावर भर द्यावा



**नांदेड (प्रतिनिधी)–** नागरिकांना शासनाच्या विविध सेवा व योजनांचा लाभ विहित कालावधीत मिळावा यासाठी महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम लागू करण्यात आला आहे. या अधिनियमाच्या प्रभावी अंमलबजावणीद्वारे नागरिकांना वेळेवर सेवा उपलब्ध करून द्याव्यात, असे निर्देश छत्रपती संभाजीनगर येथील राज्य लोकसेवा हक्क आयुक्त डॉ. किरण जाधव यांनी दिले.

महाराष्ट्र राज्य लोकसेवा हक्क अधिनियम–२०१५अंतर्गत अधिसूचित सेवांच्या अंमल–बजावणीचा आढावा घेण्यासाठी बुधवारी जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नियोजन भवन येथे बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीस जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, मनपा आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे, जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप मोळोदे, निवासी उपजिल्हाधिकारी किरण अंबेकर, उपजिल्हाधिकारी अजय शिंदे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) गिरी तसेच सर्व उपविभागीय अधिकारी व विभागप्रमुख उपस्थित होते.

आयुक्त डॉ. किरण जाधव म्हणाले, लोकसेवकांनी मानसिकता बदलून नागरिकांना घरबसल्या सर्व सेवा ऑनलाईन उपलब्ध करून द्याव्यात. विकसित भारत २०४७ या उद्दिष्टाकडे वाटचाल करताना सर्वांनी कार्यक्षमतेने काम करण्याची गरज आहे. जिल्ह्याच्या मूल्यमापनातील क्रमवारी उंचावण्यासाठी सर्व विभाग प्रमुखांनी जबाबदारीने पुढाकार घ्यावा. नागरिकांना सेवा देताना उत्कृष्ट प्रशासक म्हणून आंतरराष्ट्रीय दर्जाची लोकप्रशासन संस्कृती अंगिकारावी, असेही त्यांनी स्पष्ट केले.

राज्याच्या व भावी पिढीच्या हितासाठी अधिकाधिक सेवा ऑनलाईन करण्यावर भर द्यावा, असे त्यांनी नमूद केले. यावेळी त्यांनी अधिनियमाच्या अंमलबजावणीबाबत सादरी–करणाद्वारे सविस्तर मार्गदर्शन केले. प्रथम व द्वितीय अपीलीय अधिकाऱ्यांचे अधिकार व जबाबदाऱ्या तसेच विहित वेळेत काम पूर्ण न केल्यास लागू होणाऱ्या दंडात्मक तरतुदींची माहितीही त्यांनी दिली.

नांदेड जिल्ह्याची कामगिरी आगामी वर्षात अधिक उत्कृष्ट होण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करावेत. चालू आर्थिक वर्षअखेर ३१ मार्चपर्यंत सर्व विभागांनी उद्दिष्टपूर्ती साध्य करावी, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. जिल्हा प्रशासनाने राबविलेल्या ऑनलाईन सेवांपैकी 'ई–टपालवाला' ही सेवा उल्लेखनीय असून ती सर्व कार्यालयांत प्रभावीपणे राबवावी, अशा सूचनाही त्यांनी दिल्या.

यावेळी जिल्हाधिकारी कार्यालय, जिल्हा परिषद व महानगरपालिका प्रशासनाने अधि–नियमाच्या अंमलबजावणीबाबत केलेल्या कार्यवाहीचे सादरीकरण केले.

प्रास्ताविक उपजिल्हाधिकारी अजय शिंदे यांनी केले, तर आभार प्रदर्शन जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी केले. कर्डिले यांनी मागील वर्षभरात जिल्हा प्रशासनाने राबविलेल्या उपक्रमांची माहिती देत ३१ मार्चपर्यंत सर्व कामे प्रगतीपथावर पूर्ण करण्यात येतील, असा विश्वास व्यक्त केला.

# विद्यार्थ्यांनी निर्भय वातावरणात बारावीची परीक्षा द्यावी –जिल्हाधिकारी राहुल कर्डिले

## कॉपीमुक्त परीक्षेसाठी बैठे पथकांसहपरीक्षार्थ्यांवर करडी नरज, दोषींवर होणार कारवाई



**नांदेड (प्रतिनिधी)–** जिल्ह्यात १० फेब्रुवारीपासून इयत्ता बारावीच्या परीक्षेला सुरुवात झाली आहे. जिल्ह्यातील ११२ केंद्रांवर ही परीक्षा घेण्यात येत आहे. विद्यार्थ्यांनी कोणत्याही प्रकारचा तणाव अथवा भीती न बाळगता निर्भय वातावरणात परीक्षा द्यावी, असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी केले आहे. परीक्षेदरम्यान १०० टक्के कॉपीमुक्त अभियान राबविण्यात येणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

जिल्ह्यात १० फेब्रुवारी ते ११ मार्च २०२६ या कालावधीत इयत्ता बारावीची परीक्षा होणार असून यासाठी प्रशासन सज्ज आहे. सर्व परीक्षा केंद्रांवर अधिकारी व कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली असून, त्यांच्यामार्फत सातत्याने लक्ष ठेवले जाणार आहे. संवेदनशील परीक्षा केंद्रांवर विशेष लक्ष देण्यात येणार असून, काही केंद्रांवर बैठे पथक तैनात करण्यात आले आहे.

परीक्षेच्या पारदर्शक व सुरळीत आयोजनासाठी झूम सुविधेद्वारे निरीक्षण केले जाणार असून, यासाठी दोन नियंत्रण कक्ष, कंट्रोल रूम कार्यान्वित करण्यात आले आहेत. सर्व परीक्षा केंद्रे सीसीटीव्हीच्या निगराणीखाली ठेवण्यात आली आहेत. यादरम्यान कोणत्याही प्रकारचा गोंधळ, कॉपी किंवा अन्य गैरप्रकार आढळून आल्यास दोषींवर कठोर कारवाई करण्यात येईल, असे सक्त निर्देश जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी दिले आहेत.

# सुरक्षित इंटरनेट दिन साजरा



**नांदेड (प्रतिनिधी)–** 'सेफर इंटरनेट डे' हा दरवर्षी फेब्रुवारी महिन्यात जगभर साजरा केला जातो. यावर्षी १० फेब्रुवारी रोजी सुरक्षित इंटरनेट दिन शासकीय पॉलिटेकनिक कॉलेज, नांदेड येथे साजरा करण्यात आला.

सकाळी १० वाजता ऑनलाईन सुरक्षिततेबाबत जनजागृती मोहीम राबविण्यात आली. सुरक्षित इंटरनेट दिनाच्या निमित्ताने सायबर गुन्हे, कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करून होणाऱ्या ऑनलाइन फसवणुका, इंटरनेट वापरातील सुरक्षितता तसेच सोशल मीडियाचा योग्य वापर याबाबत जनजागृती करण्यासाठी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

या मोहिमेत विद्यार्थी व शिक्षकांनी सक्रिय सहभाग घेतला. इंटरनेटचा सुरक्षित वापर कसा करावा, सोशल मीडिया वापरताना कोणती खबरदारी घ्यावी, ओटीपी व पासवर्ड सुरक्षित ठेवण्याचे महत्त्व तसेच बँकिंग व्यवहार करताना घ्यावयाची काळजी याबाबत सविस्तर माहिती देण्यात आली.

व्याख्यानादरम्यान सायबर गुन्हे, फिशिंग हल्ले, ऑनलाइन फसवणूक, सुरक्षित पासवर्ड व्यवस्थापन तसेच डिजिटल स्वच्छता या विषयांवर सखोल मार्गदर्शन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग घेत विविध प्रश्न विचारले व सायबर सुरक्षेबाबत महत्त्वपूर्ण माहिती मिळवली. ऑनलाइन गुन्हेगारी रोखण्यासाठी व नागरिकांना सायबर सुरक्षिततेबाबत सजग करण्याच्या उद्देशाने ही जनजागृती मोहीम राबविण्यात आली.

# सिडको सार्वजनिक शिवजन्मोत्सव समितीच्यावतीने विविध कार्यक्रमांचे आयोजन

**नवीन नांदेड (प्रतिनिधी)–** सिडको सार्वजनिक शिवजन्मोत्सव समितीच्यावतीने छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. मराठा सेवा संघ, संभाजी ब्रिगेड, जिजाऊ ब्रिगेड यांच्यासह अनेक समितीच्यावतीने शिवजन्मोत्सव साजरा करण्यात येत आहे.

१९ फेब्रुवारी रोजी दुपारी २ वाजता आयोजित विविध स्पर्धातील विजेत्या स्पर्धकांना बक्षीस वितरण केले जाणार आहे. नांदेडचे खा. रविंद्र चव्हाण, आ. आनंद बोंढारकर, उपविभागीय पोलीस अधिकारी प्रशांत शिंदे, पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांच्यासह मान्यवर पदाधिकारी यांची यावेळी उपस्थिती राहणार आहे.

शिवजन्मोत्सव मिरवणूक दुपारी ३ वाजता निघणार आहे. सामान्य ज्ञान स्पर्धा १५ फेब्रुवारी रोजी जिजाऊ सृष्टी सिडको येथे आयोजित करण्यात



आली आहे. तर शिवमती हभप शिव कीर्तनकार ज्योतीताई जाधव यांच्या प्रबोधनपर कीर्तन २० फेब्रुवारी रोजी सायंकाळी ६ वाजता आयोजित करण्यात आले आहे.

दरवर्षीप्रमाणे याही वर्षी सार्वजनिक शिवजन्मोत्सव समिती सिडकोच्यावतीने दि. १९ फेब्रुवारी रोजी दुपारी २ वाजता हडको येथील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याजवळ आयोजित विविध स्पर्धातील विजेत्या स्पर्धकांना खा. रविंद्र चव्हाण, आ. आनंदराव बोंढारकर, उपविभागीय पोलीस अधिकारी प्रशांत शिंदे, ग्रामीण पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर व नवनिर्वाचित लोकप्रतिनिधी, माजी नगरसेवक, मान्यवर पदाधिकारी यांच्या उपस्थितीत बक्षीस वितरण करण्यात येणार आहे. तसेच दुपारी तीन वाजता मान्यवरांच्या हस्ते ढोलताशांच्या गजरात मुख्य मार्गावरून मान्यवरांच्या उपस्थितीत व सिडको, हडको परिसरातील प्राथमिक व माध्यमिक शाळेतील अनेक विद्यार्थी, लेझीम पथक घेऊन सहभागी होणार आहेत. ही मिरवणूक हडको ते सिडको येथील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यापासून क्रांती चौक, संभाजी चौक मार्गे जिजाऊ सृष्टी येथे सायंकाळी ७ वाजता समारोप समारोप होणार आहे.हडको येथे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याजवळ रांगोळी स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. तर प्राथमिक व माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांसाठी निबंध स्पर्धा, सामान्य ज्ञान स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. लेझीम स्पर्धा १९ फेब्रुवारी रोजी आयोजित करण्यात आली असून, या मिरवणुकीमध्ये पथकाने कवायती सादर करावयाचा आहेत.

२० फेब्रुवारी रोजी सायंकाळी ६ वाजता जिजाऊ सृष्टी सिडको येथे हभप शिव कीर्तनकार ज्योतीताई जाधव यांचा प्रबोधनपर कार्यक्रम आयोजित करण्यात आला असून, या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी मुख्यमंत्री खासदार अशोकराव चव्हाण, तर उद्‌घाटक आ. प्रतापराव पाटील चिखलीकर, यांच्या सह विशेष पाहुणे म्हणून खा.रविंद्र चव्हाण, खा.अजित गोपछेडे, शिवसेना गटनेते आमदार हेमंत पाटील,आ.आनंदराव पाटील बोढारकर, माजी आमदार मोहनराव हंबर्डे,भाजपा जिल्हाध्यक्ष डॉ.संतुकराव हंबर्डे, शिवसेना दक्षिण जिल्हाप्रमुख विनय पाटील गिरडे, नवनिर्वाचित लोकप्रतिनिधी संजय पाटील घोगरे, मंगलाताई देशमुख, सुवर्णा सतिश बस्वदे, वैजनाथ देशमुख, सौ.निरंजना राजु लांडगे यांच्यासह पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत.

## चौथ्या जनहित राज्यस्तरीय ग्रामीण साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी प्रा. डॉ. ललिता शिंदे–बोकारे यांची निवड



**नांदेड (प्रतिनिधी)–** राजर्षी शाहू महाराज ग्रामीण विकास प्रतिष्ठान जवळा ता. लोहा जि. नांदेडच्या वतीने आयोजित चौथ्या राज्यस्तरीय जनहित ग्रामीण साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी ज्येष्ठ साहित्यिका प्रा. डॉ. ललिता शिंदे/बोकारे यांची निवड करण्यात आली आहे. त्यांच्या या निवडीचे साहित्य क्षेत्रातील मान्यवरांकडून स्वागत करण्यात येत आहे.

ग्रामीण भागातील समाजजीवन साहित्यिक, विचारवंत, लोकप्रतिनिधी, प्रशासकीय अधिकारी, कर्मचारी यांनी प्रत्यक्ष ग्रामीण भागामध्ये येवून बघावे आणि त्यांच्या जीवनामध्ये बदल घडविण्यास सहकार्य करावे, मराठी भाषेचे संवर्धन व्हावे आणि वाचन चळवळ गतिमान व्हावी या उद्देशाने राजर्षी शाहू महाराज ग्रामीण विकास प्रतिष्ठान जवळा ता. लोहा, जि. नांदेडच्या वतीने राज्यस्तरीय जनहित ग्रामीण साहित्य संमेलन आयोजित करण्यात येते. त्यानिमित्त ज्येष्ठ साहित्यिक देविदास फुलारी यांच्या मार्गदर्शनाखाली आणि ग्रामीण कवी प्रा. महेश मोरे यांच्या अध्यक्षतेखाली राजर्षी शाहू महाराज ग्रामीण विकास प्रतिष्ठान या संस्थेच्या वतीने घेण्यात येणाऱ्या चौथ्या राज्यस्तरीय जनहित ग्रामीण साहित्य संमेलनाध्यक्षांच्या निवड समितीची बैठक रविवार, १ फेब्रुवारी रोजी पार पडली.

प्रा. डॉ. ललिता शिंदे/बोकारे यांचे मराठी साहित्यामध्ये मोठे योगदान असून, त्यांचे मुक्तीगाचा काव्यसंग्रह, छान छकुली काव्यसंग्रह, भूकंपाचे गाव काव्यसंग्रह, जर असच रहिलं सुरु एकांकिका, भावलीचे लगीन एकांकिका, झीम पोरी झीम बालकवितासंग्रह, पाऊस अक्षरांचा कवितासंग्रह, क्रातीज्योती सावित्रीबाई ज्योतिराव फुले (चरित्र) आदी साहित्य प्रकाशित झाले आहे.

## राजा राममोहन रॉय ग्रंथालय प्रतिष्ठान अंतर्गत ग्रंथ सादर करण्याचे आवाहन

**नांदेड (प्रतिनिधी)–** राजा राममोहन रॉय ग्रंथालय प्रतिष्ठान, कोलकाता व राज्य शासन यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात येणाऱ्या समान निधी 'ग्रंथभेट' योजना अंतर्गत सन २०२५ या कॅलेंडर वर्षात प्रकाशित झाली. मराठी, हिंदी व इंग्रजी भाषेतील ग्रंथ खरेदी करून राज्यातील शासनमान्य ग्रंथालयांना भेट स्वरूपात वितरित करण्यात येणार आहे.

या योजनेअंतर्गत खरेदीसाठी निवड करण्यात येणाऱ्या ग्रंथांचा तसेच ग्रंथालय संचालनालय स्तरावरून प्रसिद्ध होणाऱ्या शासनमान्य ग्रंथ निवड यादीमध्ये समावेश होण्यासाठी, सन १ जानेवारी २०२५ ते ३१ डिसेंबर २०२५ या कालावधीत प्रकाशित झालेले व प्रथम आवृत्ती असलेले ग्रंथ लेखक/प्रकाशकांनी प्रत्येकी एक विनामूल्य प्रत खालील पत्त्यावर सादर करणे आवश्यक आहे.

ग्रंथ सादर करण्याचा पत्ता : ग्रंथालय संचालक, ग्रंथालय संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई. सदर ग्रंथ दि. २८ फेब्रुवारी २०२६ पर्यंत सादर करणे आवश्यक असून, त्यानंतर प्राप्त होणाऱ्या ग्रंथांचा ग्रंथ निवड यादीसाठी विचार केला जाणार नाही. सन २०२५ मध्ये प्रकाशित झालेले ग्रंथ यापूर्वीच संचालनालयास पाठविले असतील, तर ते पुन्हा पाठविण्याची आवश्यकता नाही. तसेच, मुद्रण व नोंदणी अधिनियम, १८६७ अन्वये मुद्रकाने व ग्रंथ प्रदान अधिनियम, १९५४ अन्वये प्रकाशकाने सदर ग्रंथाची प्रत्येकी एक प्रत पुढील ठिकाणी पाठविणे अनिवार्य आहे. राज्य मध्यवर्ती ग्रंथालय, नगर भवन, मुंबई शासकीय विभागीय ग्रंथालय, पुणे शासकीय विभागीय ग्रंथालय, नागपूर सदर ग्रंथ पोहोचल्याची पोच पावती संबंधित ग्रंथालयांकडून प्राप्त करून, ग्रंथालय संचालनालयास ग्रंथ पाठविताना ती पोच पावती टपालामार्फत किंवा समक्ष सादर करावी.

## गोवर्धनघाट स्मशानभूमीची दुरावस्था; महापालिकेने लक्ष द्यावे, नांदेडकरांची मागणी

**नांदेड (प्रतिनिधी)–** शहरातील मध्यवर्ती ठिकाणी असलेल्या गोवर्धनघाट स्मशानभूमीची प्रचंड दुरावस्था झाली आहे. या ठिकाणी असलेले पिंजरे कमकुवत झाले आहेत. एवढेच नाही तर येथे मोकाट कुत्र्यांचा आणि डुकरांचा सुळसुळाट झाला आहे. याच बाजूला विद्युत शवदाहिनीचे काम मागील अनेक दिवसांपासून रेंगाळत पडल्याने नूतन महापौर आणि उपमहापौर यांनी याकडे लक्ष घालून या स्मशानभूमीची देखभाल व दुरुस्ती करावी अशी मागणी नांदेडकरांमधून पुढे येत आहे.

शहराच्या गोदावरी नदी काठावर असलेली शांतीधाम गोवर्धनघाट स्मशानभूमी ही शहरातील मध्यवर्ती सार्वजनिक स्मशानभूमी असून, या



ठिकाणी दररोज मोठ्या प्रमाणावर सर्व धर्मीय अंत्यसंस्कार होत असतात. परंतु दुर्दैवाने या ठिकाणी असलेले अंत्यसंस्काराचे पिंजरे तुटून गेले असून त्यामध्ये लाकूड रचने सुद्धा अवघड झाले आहे. या ठिकाणी संबंधित नातेवाईकांना प्रचंड मानसिक त्रासाला आणि अडचणींचा सामना करावा लागत आहे. या संवेदनशील विषयांमध्ये स्थानिक पालकमंत्री, खासदार, आमदार आणि नूतन महापौर आणि उपमहापौर यांनी लक्ष घालून नवीन पिंजरे उपलब्ध करून द्यावेत. तसेच येथील अनेक मूलभूत सुविधासुद्धा नाहीत त्याबाबतही धोरण ठरवावे अशी मागणी करण्यात आली आहे.

यासोबतच या परिसरात मोकाट कुत्रे आणि डुकरांचा संचार मोठ्या प्रमाणात झाला असून अंत्यसंस्काराला येणाऱ्यांवर मोकाट कुत्रे हल्ले चढवत आहेत. यांचाही महापालिकेने बंदोबस्त करावा अशीही मागणी करण्यात आली आहे.

# राजर्षी शाहू विद्यालयात बक्षीस वितरण व निरोप समारंभ संपन्न




**नांदेड (प्रतिनिधी)–** नांदेड येथील राजर्षी शाहू विद्यालयात वार्षिक स्नेहसंमेलन नुकतेच पार पडले. या स्नेहसंमेलनात विद्यार्थ्यांच्या विविध कलागुणांना वाव देण्यासाठी वेगवेगळ्या क्रीडा स्पर्धा व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत प्रथम व द्वितीय आलेल्या विद्यार्थ्यांना बक्षीस वितरण सकाळ सत्रात संपन्न झाला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून शाळेचे मुख्याध्यापक सुभाष तिवडे होते.

कार्यक्रमाच्या प्रारंभी मुख्याध्यापकांनी प्रास्ताविक भाषणात शाळेत चालणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती दिली व शाळेच्या प्रगतीचा आलेख सांगितला. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून सहाय्यक पोलीस अधीक्षक एन. एम. शशांक यांच्या हस्ते बक्षिसाचे वितरण करण्यात आले. कार्यक्रमाला संबोधित करताना शशांक म्हणाले, विद्यार्थ्यांनी तुमच्यातला माणूस जिवंत ठेवावा, उत्तम नागरिक बना आणि जीवनात आनंदी राहा, डॉ. जे. जी. वाडेकर यांच्या समृतीप्रित्यर्थ इयत्ता ५ वी ते ८ वी आणि एनएमएमएस परीक्षेत स्कॉलर ठरलेल्या खुल्या प्रवर्गातील एक व मागासप्रवर्गातील एक असे प्रत्येकी ५ हजार रूपये रोख पारितोषिक प्रसिद्ध स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ. गायत्री वाडेकर यांच्याकडून देण्यात आले. तसेच विज्ञान प्रदर्शनातील गट अ व गट ब मधून प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकाला ३०००, २०००, १००० रूपयांचे पारितोषिक व स्मृतीचिन्ह देऊन त्यांचा गौरव डॉ. गायत्री वाडेकर यांच्याकडून करण्यात आला. याप्रसंगी सकाळ सत्रातील एक गुणवंत व एक प्रज्ञावंत विद्यार्थी व दुपारसत्रातील एक गुणवंत व एक प्रज्ञावंत विद्यार्थ्याला प्रशस्तीपत्र आणि भेटवस्तू देऊन सन्मानित करण्यात आले.

दुपार सत्रात मुख्याध्यापक सुभाष तिवडे यांच्या अध्यक्षतेखाली दहावीच्या विद्यार्थ्यांना निरोप देण्यात आला. दुसऱ्या सत्राच्या निरोप समारंभाचे प्रमुख पाहुणे राष्ट्रपती पुरस्कारप्राप्त मुख्याध्यापक शिवा कांबळे होते. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना ते म्हणाले, विद्यार्थी मित्रांनो, परिश्रमाचे शिल्प कोरल्याशिवाय यश प्राप्त होत नाही. कार्यक्रमाचे अध्यख सुभाष तिवडे म्हणाले, विद्यार्थ्यांनो तुम्ही शालेय जीवनातून महाविद्यालयीन जीवनात प्रवेश करत आहात. मानवी मूल्यांची जपणूक करा, दहावीच्या परीक्षेला सामारे जाण्यासाठी शुभेच्छा दिल्या.

बक्षिस वितरणाच्या कार्यक्रमाला संस्थेचे अध्यक्ष गोपाळराव कदम, सचिव चंद्रशेखर सोनवणे, महिला पोलीस उपनिरीक्षक सविता खर्जुले, डॉ. तुकाराम जाधव, उपमुख्याध्यापिका निर्मला खुळे उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे संचालन शिवानंद टापरे, कार्तिकी लालवंडे व संस्कृती शिंदे यांनी केले. बक्षिसांचे वाचन गोपाळ मोरे व गिरी मॅडम यांनी केले. तर आभार श्रीमती मुंगल यांनी मानले. कार्यक्रमाला शाळेतील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचार व विद्यार्थी उपस्थित होते.

# दिगंबरराव बिंदू महाविद्यालयात एकदिवसीय स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन कार्यशाळा संपन्न

## वेळेचे नियोजन, जिद्द व चिकाटी हाच स्पर्धा परीक्षेतील यशाचा मंत्र –प्रा. दिनेश जाधव




**भोकर (प्रतिनिधी)–** वेळेचे नियोजन, जिद्द व चिकाटी हाच स्पर्धा परीक्षेतील यशाचा मंत्र आहे. याशिवाय यश शक्य नाही.विद्यार्थ्यांनी गरजा मर्यादित ठेवून जीवनातील ध्येयपूर्तीकडे वाटचाल करावी, असा सल्ला प्रा. दिनेश जाधव यांनी दिला. ते दिगंबर बिंदू महाविद्यालयात आयोजित एक दिवसीय कार्यशाळेत बोलत होते.

पुढे ते म्हणाले, केवळ मोठी स्वप्ने पाहून चालणार नाही, तर त्या स्वप्नांना वास्तवात उतरवण्यासाठी सातत्यपूर्ण मेहनत, नियोजनबद्ध अभ्यास आणि आत्मशिस्त आवश्यक आहे, असे राजमुद्रा अकॅडमी पुण्याचे प्रा. दिनेश जाधव म्हणाले.

भोकर येथील दिगंबरराव बिंदू महाविद्यालयात प्राचार्य डॉ. पंजाब चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली करिअर कट्टा, राज्यशास्त्र विभाग व राज्यशास्त्र अभ्यासमंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित एकदिवसीय स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन कार्यशाळा सोमवार, दिनांक ९ फेब्रुवारी २०२६ रोजी उत्साहात आणि मोठ्या प्रतिसादात संपन्न झाली. यावेळी कार्यशाळेत प्रमुख मार्गदर्शक म्हणून प्रा. दिनेश जाधव यांनी विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेतील यशाचे मूलमंत्र सांगितले.

विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना पुढे ते म्हणाले की, वेळेचे भान, सातत्य आणि प्रामाणिकपणा ही त्रिसूत्री यश मिळविण्यासाठी अत्यंत आवश्यक आहे. या त्रिसूत्रीचा अवलंब केल्यास कोणतीही स्पर्धा परीक्षा यशस्वीपणे पार करता येते, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. त्यांच्या प्रेरणादायी मार्गदर्शनामुळे उपस्थित विद्यार्थ्यांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षीय समारोपात प्रभारी प्राचार्य डॉ. सचिन तावडे यांनी विद्यार्थ्यांना उद्देशून सांगितले की, स्पर्धा परीक्षांची तयारी करताना वेळेचे योग्य नियोजन करणे जितके महत्त्वाचे आहे. नियमित महाविद्यालयात उपस्थित राहून अध्ययनाचे सातत्य राखणेही गरजेचे आहे. नियमितता आणि शिस्त हीच विद्यार्थ्यांच्या यशाची मजबूत पायाभरणी आहे, असे त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. गणपती खुपसे तर आभार डॉ. सतीश चव्हाण यांनी केले. हा कार्यक्रम यशस्वीतेसाठी प्रा. मुकुंद येगावकर, प्रा. प्रशांत टाके, डॉ. अरविंद चव्हाण, डॉ. नागेश ढोले यांचेसह महाविद्यालयातील सर्व प्राध्यापकांनी परिश्रम घेतले.

फॅशन | संसार | सौंदर्य

# सखी

# चुकीच्या क्लींजरमुळेही येतात मुरुमे...

## वेगवेगळ्या त्वचेच्या प्रकारांसाठी योग्य फेस वॉश कसा निवडायचा?

**त्वचेची काळजी घेण्याची दिनचर्या नेहमीच चेहरा स्वच्छ करण्यापासून सुरू होते. आपण अनेकदा जाहिराती किंवा मित्रांच्या सल्ल्यानुसार फेस वॉश खरेदी करतो, परंतु तुम्हाला माहित आहे का की चुकीच्या फेस वॉशमुळे अकाली वृद्धत्व, कोरडेपणा किंवा मुरुमे येऊ शकतात? तुमचा चेहरा चमकत राहण्यासाठी तुमच्या त्वचेचा प्रकार समजून घेणे आणि योग्य घटकांसह फेस वॉश निवडणे अत्यंत महत्त्वाचे आहे. तुमच्या त्वचेसाठी योग्य फेस वॉश कसा निवडायचा ते जाणून घेऊया...**

### तेलकट त्वचेसाठी...

जर तुमचा चेहरा धुतल्यानंतर लगेचच चिकट आणि चमकू लागला तर तुमची त्वचा तेलकट असते. अशा त्वचेवरील छिद्रे अनेकदा बंद होतात, ज्यामुळे ब्लॅकहेड्स आणि मुरुमे येतात. जर तुमची त्वचा तेलकट असेल तर तुम्ही फोमिंग किंवा जेल-आधारित फेस वॉश निवडावे. त्यात सॅलिसिलिक ॲसिड, ग्लायकोलिक ॲसिड, टी ट्री ऑइल किंवा कडुलिंबाचा समावेश असावा. हे त्वचेच्या तेलाचे उत्पादन नियंत्रित करतात आणि छिद्र खोलवर साफ करतात.



### कोरड्या त्वचेसाठी

जर तुमचा चेहरा धुतल्यानंतर तुमची त्वचा ताणलेली आणि पांढरी दिसत असेल तर तुमची त्वचा कोरडी असते. या प्रकारच्या त्वचेला अशा क्लींजरची आवश्यकता असते जे नैसर्गिक तेल काढून न टाकता स्वच्छ करते. तुम्ही हायल्युरोनिक ॲसिड, ग्लिसरीन, कोरफड किंवा व्हिटॅमिन ई असलेले क्रिमी किंवा लोशन-आधारित फेसवॉश निवडावे. हे त्वचेला स्वच्छ करताना हायड्रेट देखील करतात.



### कॉम्बिनेशन स्किनसाठी

हा सर्वात सामान्य त्वचेचा प्रकार आहे, ज्यामध्ये टी-झोन (कपाळ, नाक आणि हनुवटी) तेलकट असते, तर गाल कोरडे किंवा सामान्य असतात. यासाठी, तुम्ही संतुलित करणारा फेसवॉश निवडा. लॅक्टिक ॲसिड किंवा व्हिटॅमिन सी असलेले सौम्य क्लींजर तुमच्यासाठी सर्वोत्तम काम करतील.

### संवेदनशील त्वचेसाठी...

कोणतेही नवीन उत्पादन लागू करताच अशा त्वचेला जळजळ, लालसरपणा किंवा खाज सुटण्याची शक्यता असते. तुम्ही सुगंध-मुक्त आणि हायपोअलर्जेनिक फेसवॉश शोधावा. त्यात कॅमोमाइल, ओट्स किंवा सिरॅमाइड्स असावेत, जे त्वचेला मजबूत करतात.

### या गोष्टींकडे विशेष लक्ष द्या...

- पीएच बॅलन्स : आपल्या त्वचेचा नैसर्गिक पीएच सुमारे 5.5 असतो. त्वचेचे नैसर्गिक संतुलन बिघडू नये म्हणून नेहमीच 'पीएच बॅलन्स्ड' फेसवॉश निवडा.
- सल्फेट्स आणि पॅराबेन्स टाळा : सल्फेट्स (जसे की SLS) फेस वॉशमध्ये भरपूर फेस तयार करतात, परंतु ते खूप कोरडे करू शकतात. नेहमी सल्फेट-मुक्त फेस वॉश निवडा.
- हवामान परिस्थिती : लक्षात ठेवा की तुमच्या त्वचेच्या गरजा ऋतूंनुसार बदलतात. हिवाळ्यात सौम्य, क्रिमी क्लींजर आणि उन्हाळ्यात डीप-क्लींजर फेस वॉश वापरणे शहाणपणाचे आहे.
- दिवसातून दोनदा वापरा : सकाळी उठल्यानंतर आणि झोपण्यापूर्वी फेसवॉश वापरा.



# खूप कमी सनस्क्रीन लावत असाल तर मिळणार नाही संरक्षण

## तज्ज्ञांकडून योग्य प्रमाण अन् पद्धत जाणून घ्या...



**सूर्याच्या हानिकारक अतिनील किरणांपासून त्वचेचे संरक्षण करण्यासाठी सनस्क्रीन हे सर्वात महत्वाचे आणि शक्तिशाली शस्त्र आहे. आपल्या सर्वांना माहित आहे की सनस्क्रीन लावावे, परंतु लोक अनेकदा योग्य प्रमाणात वापरण्याबद्दल गोंधळलेले असतात. खरं तर, जर तुम्ही योग्य प्रमाणात सनस्क्रीन वापरत नसाल, तर बाटलीवर सूचीबद्ध केलेला SPF तो देत असलेले संरक्षण प्रदान करणार नाही. तर, योग्य संरक्षणासाठी तुम्ही किती सनस्क्रीन लावावे आणि ते कसे लावावे हे जाणून घेऊया...**

### संपूर्ण शरीरासाठी किती?

जर तुम्ही समुद्रकिनारी असाल किंवा उन्हात बाहेर जात असाल आणि शरीराचे इतर भाग देखील झाकायचे असतील, तर संपूर्ण शरीरासाठी सुमारे ३० मिली सनस्क्रीन आवश्यक आहे. यामध्ये हात, पाय आणि पाठ यांसारख्या उघड्या भागांचा समावेश आहे.

### सनस्क्रीनची योग्य मात्रा

त्वचारोगतज्ज्ञ गुरवीन वारैच यांनी सनस्क्रीनची योग्य मात्रा मोजण्यासाठी एक सोपी पद्धत विकसित केली आहे, ज्याला दोन बोटांचा नियम म्हणतात. तुमच्या तर्जनी आणि मधल्या बोटांच्या संपूर्ण लांबीवर सनस्क्रीन घ्या. हे प्रमाण तुमच्या चेहऱ्यासाठी पुरेसे आहे. तुमच्या मानेलादेखील लावण्यासाठी तीन बोटे सनस्क्रीन वापरा. हे तुमचा चेहरा आणि मान दोन्ही झाकेल. तथापि, लोक अनेकदा त्यांच्या चेहऱ्यावर सनस्क्रीन लावतात परंतु मान विसरतात. म्हणूनच वृद्धत्वाची चिन्हे प्रथम मानेवर दिसतात.

### योग्य प्रमाणात लावणे का महत्त्वाचे?

प्रति चौरस इंच त्वचेला मिलीग्राम वापरून प्रयोगशाळेत सनस्क्रीनची चाचणी केली जाते. म्हणून, जर तुम्ही खूप कमी SPF 50 सनस्क्रीन लावला तर तुम्हाला प्रत्यक्षात SPF 15 किंवा 20 सारखेच संरक्षण मिळेल. यामुळे सनबर्न, अकाली वृद्धत्व आणि त्वचेच्या कर्करोगाचा धोका वाढतो.



### सनस्क्रीन लावण्याचे संकेत नियम

केवळ योग्य प्रमाणातच नाही तर वापरण्याची पद्धत आणि वेळ देखील महत्त्वाची आहे, जसे की, सनस्क्रीन त्वचेत शोषून घेण्यास आणि संरक्षणात्मक थर तयार करण्यास वेळ लागतो. म्हणून, घराबाहेर पडण्यापूर्वी किमान २० मिनिटे आधी लावा. घाम येणे, घासणे किंवा सूर्यप्रकाशाच्या संपर्कात आल्याने सनस्क्रीनचा थर कालांतराने फिकट होऊ शकतो. दर दोन तासांनी तो पुन्हा लावणे महत्त्वाचे आहे. ढगाळ दिवसांतही ८०% पर्यंत अतिनील किरणे त्वचेपर्यंत पोहोचू शकतात. म्हणून, हिवाळा असो वा पाऊस, कधीही सनस्क्रीन वगळू नका. जुने सनस्क्रीन त्याची प्रभावीता गमावते. नेहमीच उच्च दर्जाचे उत्पादन निवडा.

# सनग्लास वापरताना...

**चेहऱ्यापेक्षा डोळ्यांची काळजी घेणे आवश्यक आहे. परंतु, अनेकजण चेहऱ्यावरच जादा लक्ष केंद्रित करतात. डोळे हे फार नाजूक आहेत. काहीजण डोळ्यांच्या संरक्षणापेक्षा सनग्लासचा फॅशन म्हणून जास्त यूज करतात.**

डोळ्यांची खास करून सकाळी व संध्याकाळी काळजी घ्यावी. सूर्यकिरणे हे डोळ्यासाठी फार नुकसानकारक असतात. त्यामुळे बाहेर पडायचे म्हटले तर सनग्लास आवश्यक लावावे. लहान मुले व ज्यांची डोळे निळे आहेत, त्यांनी जास्त सावधगिरी बाळगण्याची गरज आहे. केवळ उन्हातच गॉगल्स लावून बाहेर पडून नये तर ढगाळ वातावरण असल्यावर सुद्धा डोळ्यांना गॉगल्स लावणे आवश्यक आहे. याकरिता उत्तम ब्रॅण्डचा ग्लास खरेदी करणे आवश्यक आहे. पण केवळ चांगला सनग्लास खरेदी केला म्हणूनच त्याकडे लक्ष देण्याची गरज नाही. त्यासाठी सनग्लासची फ्रेम ही सुद्धा पाहूनच खरेदी करावी. फ्रे म चांगली नसेल तर उन्हामुळे डोळ्यांना त्रास होऊ शकतो.



# केस गळतीचे कारण असू शकते तुमचे केस; हेअर ऑइल खरेदीपूर्वी लक्षात ठेवण्याच्या 5 गोष्टी...

**अनेकदा आपण आपल्या केसांचा प्रकार समजून न घेता कोणतेही तेल लावतो, ज्यामुळे केस गळती थांबण्याऐवजी वाढू शकते. हो, बाजारात उपलब्ध असलेली प्रत्येक आकर्षक बाटली तुमच्या केसांसाठी योग्य नसते. पुढच्या वेळी जेव्हा तुम्ही केसांचे तेल खरेदी कराल तेव्हा या ५ गोष्टी लक्षात ठेवा...**



- मिनरल ऑइलपासून दूर राहा : प्रथम तेलाच्या बाटलीच्या मागील बाजूस असलेले घटक वाचा. जर त्यावर 'Mineral Oil' किंवा 'Liquid Paraffin' लिहिले असेल, तर ते ताबडतोब जिथून उचलले, तिथे परत ठेवा. ते पेट्रोलियमपासून बनलेले स्वस्त तेल असते, जे तुमच्या टाळूवर प्लास्टिकसारखा थर तयार करतात. हे केसांच्या मुळांना श्वास घेण्यापासून रोखतात आणि केस तुटण्यास कारणीभूत ठरतात. नेहमी नैसर्गिक तेले निवडा.
- तेलाची सुसंगतता : प्रत्येक तेल प्रत्येकासाठी नसते. जर तुमचे केस खूप पातळ आणि हलके असतील, तर नारळ तेल किंवा एरंडेल तेल केसांना खूप जड करेल, ज्यामुळे केस तुटू शकतात. पातळ केसांसाठी बदाम तेल किंवा आर्गन तेलसारखे हलके तेल निवडा. जर तुमचे केस जाड आणि कोरडे असतील तर जड तेल वापरा.
- सुगंधाच्या जाळ्यात अडकू नका : आपण अनेकदा तेलाचा वास घेण्यासाठी झाकण उघडतो आणि जर आपल्याला ते आवडत असेल तर ते विकत घेतो. लक्षात ठेवा, खूप तीव्र वास म्हणजे त्यात कृत्रिम परफ्यूम आणि अल्कोहोल असते. ही रसायने तुमच्या टाळूवर खाज आणि ॲलर्जी निर्माण करू शकतात, ज्यामुळे केस गळती वाढते. खऱ्या आयुर्वेदिक किंवा शुद्ध तेलांचा वास सौम्य आणि नैसर्गिक असतो.

### कोल्ड-प्रेस्ड सर्वोत्तम

बाजारात उपलब्ध असलेली स्वस्त तेले मशिनमध्ये जास्त हिट देऊन काढले जाते. ज्यामुळे त्यांचे पोषक घटक नष्ट होतात. नेहमीच कच्चे, कुस्करलेले तेल खरेदी करण्याचा प्रयत्न करा. ते थोडे महाग असू शकते, परंतु ते मूळ गुणधर्म आणि जीवनसत्त्वे टिकवून ठेवते. ज्यामुळे तुमच्या केसांना योग्य पोषण मिळते. केसांची काळजी घेणे महत्वाचे आहे, परंतु तेल अविचारीपणे लावणे योग्य नाही. तुमच्या केसांच्या गरजा समजून घ्या आणि योग्य तेल निवडा. लक्षात ठेवा, योग्य तेल तुमच्या केसांचे रक्षण करते, परंतु चुकीचे तेल त्यांना नष्ट करू शकते.

### कोंडा असेल तर तेलापासून दूर रहा



ही आपण केलेली सर्वात मोठी चूक आहे. जर तुम्हाला कोंडा असेल तर तेल लावणे म्हणजे आगीत इंधन भरण्यासारखे आहे. कोंडा हा एका प्रकारच्या बुरशीमुळे होतो जो तेल खातो आणि वेगाने वाढतो. जर तुम्हाला कोंडा असेल तर प्रथम औषधी शॅम्पूने त्यावर उपचार करा किंवा कडुनिंब आणि टी-ट्री ऑइलयुक्त तेलच वापरा.

# न धुता नवीन कपडे घालता का?

## या समस्या उद्भवू शकतात... आजच बदला तुमची सवय...

**नवीन शर्ट, नवीन ड्रेस किंवा ट्रेंडी टी-शर्ट हे सर्व तुमची जीवनशैली आणि फॅशन सेन्स अपडेट करू शकते. तुम्ही कदाचित अनेक वेळा ऐकले असेल की, नवीन कपडे घालण्यापूर्वी धुवावेत. तथापि, बरेच लोक या सल्ल्याकडे दुर्लक्ष करतात आणि ते न धुता घालतात. नवीन कपडे खरेदी केल्यानंतर लगेच घालणे तुमच्या त्वचेसाठी आणि आरोग्यासाठी हानिकारक असू शकते. आज आम्ही तुम्हाला सांगणार आहोत की नवीन कपडे घालण्यापूर्वी का धुवावेत...**



- रसायने आणि रंगांचा परिणाम : नवीन कपड्यांमध्ये रंग आणि रसायने वापरली जातात. कपड्यांची चमक दीर्घकाळ टिकवून ठेवण्यासाठी हे रंग जोडले जातात, परंतु ही रसायने तुमच्या त्वचेच्या थेट संपर्कात आल्यास ॲलर्जी आणि खाज सुटणे यासारख्या समस्या निर्माण करू शकतात. मुलांसाठी आणि संवेदनशील त्वचेच्या लोकांसाठी हे आणखी धोकादायक असू शकते. म्हणून, कपडे घालण्यापूर्वी नेहमी धुवा.
- जंतू आणि बॅक्टेरियाचा धोका : नवीन कपडे स्वच्छ दिसू शकतात, परंतु ते विविध प्रकारचे बॅक्टेरिया ठेवू शकतात. हे बॅक्टेरिया स्टोरेज दरम्यान किंवा ट्रक आणि शॉपिंग बॅगमध्ये वाहतूक करताना कपड्यांवर जमा होतात. धुतल्यानंतरच कपडे घातल्याने या संसर्गाचा प्रसार होण्याचा धोका कमी होतो.
- कारखाना आणि दुकानातील धूळ : नवीन कपडे उत्पादन, पॅकेजिंग आणि साठवणुकीदरम्यान धूळ आणि बॅक्टेरियाच्या संपर्कात येतात. कधीकधी, कारखाने आणि दुकानांमध्ये वापरल्या जाणाऱ्या रॅक आणि हँडलमधून बॅक्टेरिया कपड्यांमध्ये संक्रमित होतात. यामुळे थेट घातल्यास त्वचेचे संक्रमण किंवा किरकोळ पुरळ येऊ शकते. म्हणून, नवीन कपडे वापरण्यापूर्वी नेहमी धुवा.
- रंग फिकट होणे : कपड्यांची गुणवत्ता धुतल्यानंतरच ठरवली जाते. बहुतेक नवीन कपडे रंग गमावतात. जर तुम्ही ते न धुता घातले तर रंग थेट तुमच्या त्वचेवर जाऊ शकतो. शिवाय, धुतल्यानंतर, कापड आकुंचन पावते किंवा मऊ होते, ज्यामुळे ते घालणे सोपे होते आणि त्वचेसाठी सुरक्षित होते.

# सुनेत्रा पवारांनी घेतली पीएम मोदींची भेट



**नवीदिल्ली(प्रतिनिधी)** – पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्यात बुधवार, दि. ११ फेब्रुवारी रोजी दिल्लीत साधारणतः ४० मिनिटांची बैठक झाली. या बैठकीत विविध राजकीय आणि प्रशासकीय विषयांवर चर्चा झाल्याची माहिती आहे. अजित पवार यांच्या निधनाबद्दल पंतप्रधानांनी शोकसंवेदना व्यक्त केल्या. तसेच, राज्याच्या राजकारणात त्यांच्या योगदानाचा उल्लेख करत कुटुंबियांसोबत सहवेदना व्यक्त केल्याचे सांगितले जाते. एनडीएतील घटक पक्ष म्हणून राष्ट्रवादी काँग्रेससोबत ठापणे उभे राहू, अशी ग्वाही पंतप्रधानांनी दिली. तत्पूर्वी, राष्ट्रवादी काँग्रेसचे कार्याध्यक्ष प्रफुल पटेल यांच्या दिल्ली निवासस्थानी 'ब्रेकफास्ट पे चर्चा' चर्चा झाली. या बैठकीत उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे, पार्थ पवार आणि प्रफुल्ल पटेल सहभागी झाले होते. या बैठकीत दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस गटांच्या संभाव्य एकत्रीकरणासह आगामी राज्यसभा निवडणुकीच्या रणनीतीवर सविस्तर चर्चा झाल्याची सूत्रांची माहिती आहे. राज्यातील बदलत्या राजकीय समीकरणांच्या पार्श्व-भूमीवर एकत्रीकरणावर चर्चा झाल्याचे समजते.

आगामी राज्यसभा निवडणूक हा देखील बैठकीतील प्रमुख विषय होता. पार्थ पवार यांना राज्यसभेवर पाठवण्याची शक्यता चर्चेत आल्याचे सांगितले जाते. पक्षांतर्गत पातळीवर त्यांच्या नावावर गंभीर विचार सुरू असल्याचे संकेत मिळत आहेत. या सर्व घडामोडींच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेसने एनडीएतील घटक पक्ष म्हणून आपली भूमिका अधिक स्पष्ट करण्याचे ठरवले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्याशी होणाऱ्या संभाव्य भेटीपूर्वी पक्षाची अधिकृत भूमिका निश्चित केली. दुसरीकडे, सोमवारी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस अचानक दिल्लीत आल्याने राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले होते. रात्री उशिरा फडणवीस यांनी वरिष्ठ भाजप नेत्यांची भेट घेतली आणि त्यानंतर मुंबईत परतले होते. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या विलीनीकरणाबाबतच्या चर्चा होत असतानाच हा दौरा झाला. मुख्यमंत्री फडणवीस यांच्या सोमवारी रात्री उशिरा झालेल्या गुप्त दिल्ली भेटीनंतर सुनेत्रा पवार यांच्या या भेटीला विशेष महत्त्व दिले जात आहे.

महाराष्ट्रातील १२ जिल्हा परिषदा आणि १२५ पंचायत समित्यांच्या नुकत्याच झालेल्या निवडणुकीत भाजपने पहिले स्थान पटकावले, तर अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष दुसऱ्या क्रमांकावर राहिला. यापूर्वी, भाजपने महानगरपालिका आणि नगरपालिका निवडणुकीत विक्रमी जागा जिंकून लक्षणीय यश मिळवले होते. ७३१ जिल्हा परिषदेच्या जागांपैकी भाजपकडे सर्वाधिक २३३ सदस्य निवडून आले आहेत. त्यानंतर अजित पवार गट १६७ जागांसह दुसऱ्या आणि शिंदे सेना १६२ जागांसह तिसऱ्या क्रमांकावर दुसरीकडे, काँग्रेसने ५६, शरद पवार गटाने २६ आणि उद्धव सेनेने ४३ जागा जिंकल्या आहेत.

## जम्मू व हिमाचलमध्ये पाऊस; बर्फवृष्टीची शक्यता

**दिल्ली(प्रतिनिधी)**–हवामान खात्याने जम्मू-काश्मीर आणि हिमाचल प्रदेशात हलका पाऊस आणि हिमवृष्टीचा इशारा दिला आहे. आयएमडीने म्हटले की, पश्चिमी विक्षोभाच्या प्रभावामुळे, १२ फेब्रुवारी दरम्यान पश्चिम हिमालयीन प्रदेशात पाऊस आणि हिमवृष्टी होण्याची शक्यता आहे.

उत्तर प्रदेश आणि उत्तराखंडमध्ये दाट धुक्याचा इशारा जारी करण्यात आला आहे. उत्तर प्रदेशात ऑरेंज अलर्ट आणि उत्तराखंडमध्ये यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. हवामान खात्याने म्हटले आहे की, तामिळनाडू आणि आंध्र प्रदेशच्या किनारपट्टी भागातही दाट धुके दिसू शकते. पुढील ७ दिवसांत देशाच्या उर्वरित भागात कोणताही महत्त्वपूर्ण हवामान बदल होणार नाही.


## Change In Name

My Old Name is Raju Sadashivrao Phule which now i am changing as new Name Rajiv Sadashivrao Phule hence forth my all correspondance will be done as per my New Name i.e Rajiv Sadashivrao Phule please Consider the Name.

Address: Gajanan Mandir Phule Nagar Ardhapur Dist-Nanded.

Mob.No : 8007067453

## Change In Name

My Old Name is SAFARPASHA which now I am changing as New Name SAFAR SHAH Hence forth my all Correspondance will be done as per my new name Please consider the Same.

Address - 9-7-769/1. Islampura, Degloor Naka. Itwara Nanded. PO: Itwara Nanded. DIST: Nanded. Maharashtra-431604

Mo. +91 98816 54947


## कामगार संघटनांचा आज भारत बंद

**मुंबई(प्रतिनिधी)**–विविध कामगार संघटनांनी १२ फेब्रुवारी रोजी देशव्यापी संपाची हाक दिल्याने दैनंदिन व्यवहारांवर परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. नव्या कामगार कायद्यांविरोधात आणि काही आर्थिक धोरणांच्या निषेधार्थ हा बंद पुकारण्यात आला आहे.

संपामध्ये देशातील १० प्रमुख केंद्रीय ट्रेड युनियनचा सहभाग असून INTUC, ITUC, HMS, CITU यांसह इतर संघटनांनी कामगारांच्या हक्कांबाबत चिंता व्यक्त केली आहे. नव्या लेबर कोडमुळे नोकरीची सुरक्षितता कमी होईल, कंपन्यांना कर्मचाऱ्यांना कामावरून कमी करण्याचे स्वातंत्र्य वाढेल आणि किमान वेतन तसेच सामाजिक सुरक्षेवर परिणाम होईल, असा आरोप संघटनांनी केला आहे. चारही नवीन कामगार कायदे रद्द करणे, काही प्रस्तावित विधेयके मागे घेणे आणि मनरेगा अधिक बळकट करणे या प्रमुख मागण्या पुढे करण्यात आल्या आहेत. तसेच ग्रामीण रोजगार हमी योजनांबाबतही संघटनांनी आक्षेप नोंदवला आहे.

**काय सुरू, काय बंद?**

संपामुळे सार्वजनिक क्षेत्रातील बँकांच्या कामकाजावर परिणाम होण्याची शक्यता आहे. काही बँक कर्मचारी संघटनांनी संपात सहभागी होण्याचा निर्णय घेतला आहे. मात्र, रिझर्व्ह बँक किंवा संबंधित बँकांकडून अधिकृत सुट्टी जाहीर करण्यात आलेली नाही.

## कृत्रिम बुद्धिमत्ता आणि कृषी क्षेत्रातील जागतिक आणि गुंतवणूक शिखर परिषद महाराष्ट्रात

**नवी मुंबई(प्रतिनिधी)**–कृत्रिम बुद्धिमत्तेच्या माध्यमातून महाराष्ट्रातील शेतकऱ्याला जागतिक तंत्रज्ञानाची माहिती व्हावी, नाविन्यपूर्ण तंत्रज्ञानाचा वापर शेतीमध्ये व्हावा. 'महाराष्ट्र कृषी-कृत्रिम बुद्धिमत्ता धोरण २०२५-२०२९' धोरणातंर्गत 'जागतिक कृषी क्षेत्रातील कृत्रिम बुद्धिमत्ता परिषद आणि गुंतवणूकदार शिखर संमेलन'(एआय फॉर ॲग्री २०२६) ही परिषद २२ आणि २३ फेब्रुवारी रोजी मुंबईत जिओ वर्ल्ड कन्व्हेन्शन सेंटर येथे आयोजित करण्यात आली आहे.

कृषी क्षेत्रातील जागतिक तज्ज्ञ, कृषी आणि संलग्न क्षेत्रातील नवे स्टार्टअप, गुंतवणूकदार, वित्तीय संस्था यामध्ये सहभागी होणार आहेत, अशी माहिती कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी मंत्रालय विधिमंडळ वार्ताहर कक्ष येथे आयोजित पत्रकार परिषदेत दिली. यावेळी कृषी विभागाचे अपर मुख्य सचिव विकास चंद्र रस्तोगी, कृषी आयुक्त सूरज मांढरे उपस्थित होते.

कृषी मंत्री दत्तात्रय भरणे म्हणाले की, महाराष्ट्राच्या कृषी विकासाच्या प्रवासात महत्त्वाचा टप्पा मानली जाणारी एआय फॉर ॲग्री २०२६ ही जागतिक परिषद येत्या २२ आणि २३ फेब्रुवारी रोजी मुंबईत जिओ वर्ल्ड कन्व्हेन्शन सेंटर येथे आयोजित करण्यात आली आहे. एआय फॉर ग्री ही परिषद वर्ल्ड इकॉनॉमिक फोरम, एफएओ, युएनडीपी, आयएफएडी, वर्ल्ड बँक समूह, आशियाई विकास बँक (एडीबी), इंटरनॅशनल क्रॉप्स रिसर्च इन्सिटीट्यूट फॉर दी सेमी रीड ट्रापीक्स (आयसीआयएसएटी), भारतीय विज्ञान संस्था (आयआयएससी), एम.एस.स्वामिनाथन रिसर्च फाउंडेशन (एमएसएसआरएफ) जागतिक व राष्ट्रीय भागीदारांच्या सहकार्याने आयोजित करण्यात येत आहे. राज्यात जाहीर करण्यात आलेल्या 'महाराष्ट्र कृषी-कृत्रिम बुद्धिमत्ता धोरण २०२५-२०२९' च्या अंमलबजावणीकडे टाकलेले हे महत्त्वाचे पाऊल आहे. या एआय धोरणाच्या निर्मितीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे मार्गदर्शन लाभले, तसेच दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या दूरदृष्टीतून शेतीला आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देण्याची प्रेरणा मिळाली.

कृषी आणि संलग्न क्षेत्रातील नवे स्टार्टअप, गुंतवणूकदार, वित्तीय संस्था आदींसाठी एक व्यासपीठ म्हणून परिषदेचा उपयोग करून घेता येईल, असे त्यांनी सांगितले.


## Change In Name

My Old Name is ARCHANA HARIRAM WANJE which now I am changing as New Name ARCHANA KAILAS SHINDE Hence forth my all Correspondance will be done as per my new name Please consider the Same.

Address - W/o Kailas Shinde 1-2-1573 Mahajan Niwas Phule Nagar Road, Kailas Hotel, Shivaji Nagar, Nanded-431602

## टी. सी. हरवली आहे

माझी मार्तंड गोविंद गायकवाड या नावाची इयत्ता ०७ वी पास ची टिसी मुखेड ते पुणे प्रवासात हरवली आहे. तरी कोणास सापडल्यास खालील पत्यावर संपर्क साधावा.

**संपर्क पत्ता**–मार्तंड गोविंद गायकवाड मु. तुपदाळ बु. पो. पाळा, ता. मुखेड, जि. नांदेड.

मो नं. ९८५००११०६७

## कागदपत्रं हरवले आहे

माझे मोहन जळबाजी हंबर्डे या नावाचे महत्त्वाचे शैक्षणिक कागदपत्र व पूरग्रस्त प्रमाणपत्र क्र. १५९० ईत्यादी विष्णुपुरी ते सिडको ऑटो प्रवासात हरवले आहे. ज्यांना कोणाला सापडल्यास त्यांनी कृपया खालील पत्यावर संपर्क साधावा. **संपर्क पत्ता :– मोहन जळबाजी हंबर्डे रा. विष्णुपुरी ता. जि. नांदेड**

**मो. ८४४६१५५९२६**


## मुंबई महापालिकेत पहिल्या दिवशी राडा, खाली बसावं लागल्याने संताप; ठाकरेंचे नगरसेवक आक्रमक



**मुंबई(प्रतिनिधी)**–राज्याचं लक्ष लागलेल्या मुंबई महापालिकेत अखेर आज महापौरपदी भाजप नेत्या रितू तावडे यांनी शपथ घेत पदभार स्वीकारला. तर, शिवसेनेच्या संजय घाडी यांची उपमहापौरपदी निवड झाली असून, त्यांचाही शपथविधी सोहळा संपन्न झाला. त्यामुळे, मुंबई महापालिकेचं कामकाज आजपासून खऱ्या अर्थाने सुरू झाल्याचं पाहायला मिळालं. मात्र, पहिल्याच दिवशी सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये चांगलाच गोंधळ झाल्याचं दिसून आलं. काँग्रेसच्या महिला नगरसेवकांनी आक्रमक होत घोषणाबाजी केली. तर, ठाकरेंच्या नगरसेवकांनीही सभागृहातून काढता पाय घेतला.

महापौर आणि उपमहापौर यांनी सभागृहात भाषण केले, यावेळी शिवसेना नेते उपमहापौर संजय घाडी यांच्या भाषणाची प्रत फाडून ठाकरेंच्या नगरसेवकांनी सभागृहातून काढता पाय घेतला. तर, किशोरी पेडणेकर यांनी शिंदेच्या नगरसेवकांची बॉडी लँग्वेज विक्षिप्त होती, असा आरोप केला आहे. आता, त्यावर उपमहापौर संजय घाडी यांनी प्रतिक्रिया दिली आहे.

नुकतेच महापौरपदी रितू तावडे आणि उपमहापौरपदी माझी निवड झाल्याची घोषणा पीठासन अधिकारी, आयुक्तांनी केली. महापौर आणि उपमहापौर यांची घोषण होऊन सभागृह संपलं आहे. महायुतीच्या सगळ्या नेत्यांचे मी आभार मानतो, अशी प्रतिक्रिया उपमहापौर संजय घाडी यांनी दिली. काँग्रेसला महाराष्ट्रात जागा नाही, त्यांच्यासाठी जागा नव्हती, ठाकरेंचे नगरसेवक तिकडे बसले. मुख्यमंत्री यांच्या लाडक्या बहिणी शहर आणि ग्रामीण भागात खुश आहेत. नगरसेवक आणि नगरसेविका त्यांचे आसन मिळण्याचा अधिकार होता, असं मनापासून वाटत. ठाकरेंच्या नगरसेवकांकडून सभात्याग करणे हे वारंवार होईल. मात्र, आजच्या दिवशी होईल अस वाटलं नाही, अशी प्रतिक्रिया घाडी यांनी ठाकरेंच्या नगरसेवकांनी केलेल्या वॉक आऊटवर दिली. लोकशाहीला साजेल अस त्यांनी वागायला पाहिजे होते, जनतेने दाखवलं ना, खोके कोणाकडे आणि ओके कोण झाले ते. जिल्हा परिषदेत आम चे दुसऱ्या क्रमांकावर लोकप्रतिनिधी निवडून आले आहेत. मग त्यांनी विचारावं ओके कोण? असा सवालही घाडी यांनी केला.

काँग्रेसच्या महिला नगरसेवकांना आज जमिनीवर बसावे लागले, आज आम्ही प्रदुषणाच्या मुद्द्यावर मास्क घालून आलो होतो. मात्र आम्हाला बसायलाही जागा दिली नाही. भाजपच्या पहिल्या महापौर बसल्यानंतर आम्ही मात्र जमिनीवर होतो. देवाभाऊंची बहिण महापौराच्या खुर्चीवर आणि आमच्या बहिणी जमिनीवर होत्या, अशी प्रतिक्रिया काँग्रेस नगरसेवक अश्रफ आजमी यांनी दिली.

आम्ही गोंधळ केला नाही, शिंदे गटानं बॉडी लँग्वेज वेगळी ठेवून घोषणाबाजी केली. मुंबईत महिला महापौर बसत आहेत, त्यांना शुभेच्छा. पण त्यांच्या बॉडी लँग्वेज आत्ताच अशा वाईट आहेत. शिंदेंच्या नगरसेवकांची बॉडी लँग्वेज विक्षीप्त होती, असा आरोप ठाकरेंच्या नगरसेविका किशोरी पेडणेकर यांनी केला आहे.

## छत्रपती संभाजीनगरात १२ वीच्या इंग्रजी पेपरदरम्यान गैरप्रकार उघड

**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी)** –जिल्ह्यातील राष्ट्रीय उच्च माध्यमिक विद्यालय, जैतापूर येथे इयत्ता १२ वीच्या इंग्रजी पेपरदरम्यान मोठा गैरप्रकार उघड झाला आहे. परीक्षा केंद्रावरील सीसीटीव्ही फुटेज आणि उत्तरपत्रिकांच्या झेरॉक्स प्रतींच्या आधारे तब्बल १९ पर्यवेक्षक आणि केंद्रसंचालकांवर कठोर कारवाई करण्यात आली आहे. या घटनेमुळे शिक्षण क्षेत्रात मोठी खळबळ उडाली आहे.

दक्षता समितीचे अध्यक्ष तथा छत्रपती संभाजीनगरचे जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, मुख्य कार्यकारी अधिकारी अंकित आणि विभागीय बोर्डाचे अध्यक्ष अनिल साबळे यांच्या आदेशानुसार ही कारवाई करण्यात आली. शिक्षणाधिकारी (माध्यमिक) श्रीमती अश्विनी लाठकर यांच्या नेतृत्वाखाली भरारी पथकाने संपूर्ण तपास पूर्ण केला.

दिनांक १० फेब्रुवारी २०२६ रोजी झालेल्या इंग्रजी पेपरदरम्यान काही विद्यार्थी एकमेकांच्या उत्तरपत्रिकांकडे पाहून नक्कल करत असल्याचे निदर्शनास आले. त्यानंतर परीक्षा केंद्रावरील सीसीटीव्ही फुटेजची सखोल तपासणी करण्यात आली. फुटेजमध्ये विद्यार्थ्यांच्या हालचाली स्पष्ट दिसून आल्या असून, गैरप्रकार सिद्ध झाल्याने प्रशासनाने तात्काळ कारवाई केली.

या प्रकरणात परीक्षा केंद्र संचालकासह एकूण १९ जणांविरुद्ध कारवाई करण्यात आली आहे. जिल्हा परिषद कर्मचारी असलेल्या पर्यवेक्षक शिक्षक आणि तिथल्या पथकातील अधिकाऱ्यांविरुद्ध निलंबनाचे प्रस्ताव दाखल करण्यात आले आहेत. इतर संस्थांशी संबंधित कर्मचाऱ्यांवर संस्थांतर्गत शिस्तभंगात्मक तसेच कायदेशीर कारवाई करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.


**तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी बिलोली ता. बिलोली यांचे कार्यालय**

प्रकरण : जन्म नोंद घेणे बाबत.

अर्ज/आवक क्र.३०३/२०२५

## जाहीर प्रगटन

याअर्थी सर्व जनतेस कळविण्यास येते की, अर्जदार किशोर विठ्ठल वीर, वय ४० धंदा-मजुरी, रा. लोहगांव ता. बिलोली यांनी या कार्यालयात हजर राहून नामे मयुर किशोर वी या मुलाचे जन्म मुत्यू नोंदणी (सुधारणा) कायदा २०२३ मधील कलम ११(२) व (३) अन्वये दि.१०/१२/२०२५ रोजी जन्म नोंद घेण्यासाठी अर्ज दाखल केला आहे.

अर्जदार यांचा मुलगा नामे मयुर किशोर वीर, रा. लोहगाव ता. बिलोली यांचा जन्म दि.२४/०९/२०१० रोजीची नोंद ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय लोहगाव ता. बिलोली, जि. नांदेड येथे उपलब्ध नाही.

त्याअर्थी या जाहीर प्रगटनाद्वारे सर्व जनतेस व संबंधितास कळविण्यात येते की, अर्जदार मुलगा नामे मयुर किशोर वीर यांच्या जन्माची नोंद घेण्यासाठी कोणाचा काही आक्षेप अथवा उजर असल्यास त्यांनी जाहीर प्रगटन प्रसिध्द झाले पासुन पंधरा दिवसात या न्यायालयात स्वत: किंवा वकीला मार्फत हजर राहून आपला आक्षेप नोंदवावा. विहित कालावधीत हजर राहून आक्षेप किंवा उजर न केल्यास सदरच्या अर्जावर एकतर्फी आदेश पारित करण्यात येईल.

आज दिनांक २२/१२/२०२५ रोजी माझ्या सहीनिशी व या कार्यालयाच्या शिक्क्यानिशी जाहीर प्रगटन प्रसिध्द करण्यात येत आहे.

**तालुका कार्यकारी दंडाधिकारी**

बिलोली


## महावितरणचा 'सुरक्षा मंत्र'; प्रत्येक सोमवारी तांत्रिक कर्मचारी घेताहेत विद्युत सुरक्षेची शपथ

**मुंबई(प्रतिनिधी)**–विद्युत सुरक्षेला सर्वोच्च प्राथमिकता देत 'शून्य विद्युत अपघात' उदिद्ष्टासाठी महावितरणने राज्यातील उपविभाग व शाखा कार्यालयांमध्ये प्रत्येक सोमवारी किंवा आठवड्याच्या पहिल्या दिवशी कामाची सुरवात विद्युत सुरक्षा शपथेने करण्याचे निर्देश एका परिपत्रकाद्वारे नुकतेच दिले आहे. कर्मचाऱ्यांच्या मानसिकतेत विद्युत सुरक्षिततेचे महत्त्व रुजवण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे.

महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेशचंद्र यांनी शून्य विद्युत अपघात उद्दिष्टाची प्रभावी व सातत्याने अंमलबजावणी करण्याची सूचना केली. त्याप्रमाणे संचालक (मानव संसाधन) राजेंद्र पवार यांनी विद्युत सुरक्षेबाबत उपाययोजना व लोकसहभागातील उपक्रमांना वेग दिला आहे. 'अभियंते व कर्मचाऱ्यांसाठी विद्युत सुरक्षा ही केवळ नियमावली नसून दैनंदिन कामाचा एक भाग आहे. प्रत्येक जीव मौल्यवान असल्याने 'शून्य विद्युत अपघात' हेच महावितरणचे ध्येय आहे. त्यामुळे विद्युत सुरक्षेचे कायम तंतोतंत पालन करावे, असे आवाहन अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनी केले आहे.

विद्युत सुरक्षेबाबत सजग व सतर्क राहावे यासाठी महावितरणच्या ६६४ उपविभाग व ३२९१ शाखा कार्यालयांमध्ये प्रत्येक सोमवार हा सुरक्षा दिवस ठरविण्यात आला आहे. प्रत्येक सोमवारी किंवा आठवड्यातील कामाच्या पहिल्या दिवशी या दोन्ही कार्यालयातील अभियंते व तांत्रिक कर्मचारी सकाळी कामाची सुरुवात सुरक्षा शपथेने करीत आहे. त्यानंतर सर्व तांत्रिक कर्मचाऱ्यांच्या वैयक्तिक सुरक्षा उपकरणे व तांत्रिक साधनांची तपासणी करण्यात येत आहे. ते सुस्थितीत असल्याची खात्री केल्यानंतरच क्षेत्रीय कामांना सुरुवात होत आहे.

यासोबतच तांत्रिक कर्मचाऱ्यांसोबत आयोजित सर्व बैठकींची सुरवात देखील विद्युत सुरक्षा शपथेनेच करण्यात येणार आहे. या सर्व उपक्रमांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी सुरक्षा अधिकारी म्हणून मंडलस्तरावर कार्यकारी अभियंता (प्रशासन) आणि विभागस्तरावर अतिरिक्त कार्यकारी अभियंता यांच्यावर देण्यात आली आहे.

केंद्रीय विद्युत प्राधीकरणाच्या मार्गदर्शक तत्त्वानुसार महावितरणने कर्मचाऱ्यांसह नागरिकांच्या विद्युत सुरक्षेसाठी विविध उपाययोजना व उपक्रमांना मोठी गती दिली आहे. जून २०२५ मध्ये महावितरणच्या २० व्या वर्धापन दिनानिमित्त विद्युत सुरक्षेच्या जनजागृतीसाठी राज्यभरात विविध उपक्रमांचे आयोजन केले होते. यामध्ये तब्बल २ लाख ११ हजारांवर नागरिक, शालेय विद्यार्थी, अभियंता, अधिकारी व कर्मचाऱ्यांनी प्रत्यक्ष सहभाग घेतला. यासह २ कोटी ८५ लाख वीजग्राहकांना विद्युत सुरक्षेचा थेट वैयक्तिक संदेश देण्यात आला.

या अभियानाची जागतिकस्तरावर नोंद घेण्यात आली. तसेच सुरक्षितपणे देखभाल व दुरूस्तीचे कामे करण्यासाठी तांत्रिक कर्मचाऱ्यांना महावितरणकडून २० ते २५ प्रकारचे वैयक्तिक व कॉमन सुरक्षा साधने देण्यात येतात. ही सुरक्षा साधने आवश्यकतेनुसार व मागणीप्रमाणे संबंधित कर्मचाऱ्यांना तात्काळ देण्यासाठी स्वतंत्र 'टी अ‍ॅण्ड पी रजिस्टर मॉड्यूल' कार्यान्वित करण्यात आले आहे.


## जिल्हाधिकारी कार्यालय नांदेड

महात्मा गांधी पुतळ्या जवळ, स्टेशनरोड वजिराबाद, नांदेड-४३१६०१

दूरध्वनी क्र. (०२४६२) २३५०७७ ई-मेल: nandedrdcgmail.com

वेब साईट-www.nanded,gov.in ई-२९९८५२६ फॅक्स क्र. :(०२४६२) २३८५००

क्रमांक २०२४-आरबी-१-डेस्क-२-टे-५/१-RONOC-प्र.क्र.-३३

## जाहीर प्रगटन

एक्सप्लोझीव नियम, २००८ चे कलम १०३ (३) (अ) नुसार)

विषय:-नियोजित गट क्र. ६ (भाग), मौजे म्हाळजा ता.जि. नांदेड येथे नविन रिटेल आऊटलेटसाठी नाहरकत प्रमाणपत्र मिळणे बाबत

संदर्भ-विभागीय किरकोळ विक्री प्रमुख, इंडियन ऑयल कॉ.लि. औरंगाबाद यांचे पत्र AURDO/NANDRABAD, दिनांक २३.०१.२०२४

विभागीय किरकोळ विक्री प्रमुख, इंडियन ऑयल कॉर्पोरेशन लिमिटेड, विभागीय कार्यालय, औरंगाबाद यांनी गट क्र. ६ (भाग), मौजे म्हाळजा ता. जि. नांदेडमध्ये नवीन रिटेल आऊटलेट (पेट्रोलपंप) उभारण्यासाठी या कार्यालयाचे ना हरकत प्रमाणपत्राची मागणी केलेली आहे. प्रस्तुत ठिकाणी नविन रिटेल आऊटलेट (पेट्रोलपंप) उभारण्यासाठी कंपनीने श्रीमान संदीप दिलीपराव पावडे, रा. नांदेड, ता. जि. नांदेड (७८८७७६८३३३) यांना डिलरशिप दिलेली आहे.

सदरील पेट्रोलपंप उभारायचा भूखंड गट क्र. ६ (भाग), मौजे म्हाळजा ता. जि. नांदेड हा श्री संदीप दिलीपराव पावडे यांच्या मालकीचा असुन सदर जमिनीचे एकूण क्षेत्र ०.३३ पैकी ०.२० आर इतके आहे.

सबब, उपरोक्तप्रमाणे प्रस्तावित जागेत इंडियन ऑईल कॉर्पोरेशन लिमिटेड, सोलापूर यांना नविन रिटेल आऊटलेट (पेट्रोलपंप) उभारण्यासाठी नाहरकत प्रमाणपत्र देण्याच्या अनुषंगाने कोणाचाही कोणताही आक्षेप असल्यास जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी कार्यालय, नांदेड येथे हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून पंधरा (१५) दिवसाचे आत लेखी आक्षेप/हरकती कार्यालयीन वेळात समक्ष सादर कराव्यात. मुदतीनंतर प्राप्त झालेले आक्षेप विचारात घेतले जाणार नाहीत.

मुदतीत प्राप्त आक्षेप/हरकती सुनावणी घेऊन अंतिम करण्यात येतील याची सर्व जनतेने नोंद घ्यावी.

**अप्पर जिल्हादंडाधिकारी,**

**नांदेड**

## पाहिजे

कुशल आय.टी.आय. इलेक्ट्रीशियन/मोटार वाईडींग अनुभव व तसेच आय.टी.आय. टर्नर ट्रेड अनुभव किमान ५ वर्षे असावा. कमीत कमी वेतन १५,०००/- रू.

इच्छुकांनी खालील पत्यावर संपर्क करावा.

**-: संपर्क पत्ता :-**

**उषा इलेक्ट्रीकल वर्क्स,**

**सिडको एम.आय.डी.सी. नांदेड**

**मो.नं. ९९६०१२८१९१**

## कुत्रीचे पिल्ले विकणे आहे

डॉबर मॅन, जर्मन शेफर्ड, ग्रेडन, लेबरा डॉग, पामोलियन इत्यादी १२० प्रकारच्या जातीची कुत्रीचे पिल्ले मिळतील.

संपर्क गोपालअण्णा

डॉग डिलर

मोबाईल नंबर

९८५०६८८५२८



**रामबाण ईलाज**

वात रोगावर, गुडघेदुखी, संधीवात, आमवात, मनक्यात गॅप येणे, नस दबणे यावर खात्रीशीर ईलाज.

:: पत्ता ::

**सेवा क्लिनीक**

गणराज फर्निचरच्या बाजुला मेन रोड तुप्पा पाटी, नांदेड -९

संपर्क : डॉ. सय्यद ताहेर, मो. ९६७३५५१९००, ९७६७७१९१०१

तसेच दवाखान्यात बीएएमएस महिला डॉक्टरची नेमणूक करणे आहे.



# गोदातीर समाचार



**पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस**

हर्बल ट्रिटमेंट

१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...



किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.

पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड

मो. 9284804221, 9637704308




## दाभड येथे भुयारी मार्गासाठी ग्रामस्थांचा रास्ता रोको

### आंदोलनाची दखल घेत राष्ट्रीय महामार्ग अधिकाऱ्यांनी भुयारी पुलाच्या मंजुरीचे दिले पत्र





**अर्धापूर (प्रतिनिधी) –** तालुक्यातील दाभड हे गाव राष्ट्रीय महामार्गावर असल्याने गावात जाण्यासाठी भुयारी रस्ता करून द्यावा या मागणीसाठी ४ गावच्या ग्रामस्थांनी मंगळवार, दि. ११ रोजी राष्ट्रीय महामार्गावर रास्ता रोको आंदोलन केले. त्यामुळे या मार्गावरील वाहतूक ठप्प झाली होती. या आंदोलनाची दखल घेत राष्ट्रीय महामार्गाच्या अधिकाऱ्यांनी भुयारी रस्त्यासाठी मंजुरी मिळाली असल्याचे पत्र आंदोलकांना दिले. त्यामुळे नागरिकांना दिलासा मिळाला आहे.

दाभड राष्ट्रीय महामार्गावर वाहनांच्या धडकेत दोन महिला मृत्यू झाल्यामुळे दाभड, बामणी, शेलगाव खु. बुद्रुक गावकऱ्यांना राष्ट्रीय महामार्गावर जीव मुठीत धरून रस्ता पार करावा लागत आहे. राष्ट्रीय महामार्गावरून या चार गावकऱ्यांनी सुरक्षित रस्त्याने प्रवास करता यावा यासाठी २ तास रास्ता रोको आंदोलन केल्यामुळे राष्ट्रीय महामार्गाच्या अधिकाऱ्यांचे तारे जमीनवर आल्याने त्यांनी लगेच येऊन भुयारी मार्गाला मंजुरी मिळाली असल्याचे पत्र आंदोलकांना दिले. राष्ट्रीय महामार्गाचे अधिकारी वेळ काढून धोरण अवलंबन करत फक्त बनवाबनवी करत होते. त्यामुळे राष्ट्रीय महामार्गावर अपघातात वाढ होत होती व कोणतेही रस्ते पूर्ण होत नसल्याने जनतेला जीव मुठीत धरून राष्ट्रीय महामार्गावर प्रवास करावा लागत आहे. यासाठी लोकप्रतिनिधींनी राष्ट्रीय महामार्गाच्या बनवाबनवीला लगाम घालावा, अशी मागणी जनतेतून होत आहे.

दाभड येथील जनतेने केलेल्या आंदोलनात महिलाही मोठ्या संख्येने सहभागी झाल्यामुळे राष्ट्रीय महामार्गाचे अधिकारी जमिनीवर येऊन तुमच्या सगळ्या मागण्या मान्य करू, आंदोलन मागे घ्या, अशी विनंती केली. यावेळी आंदोलकाच्या आक्रमक पवित्र्यामुळे चार गावच्या भुयारी पुलाचा प्रश्न मार्गी लागला असून, भुयारी पुलामुळे चार गावांतील विद्यार्थी, शेतकरी, जनतेला दिलासा मिळणार आहे.

## बोलीभाषेपेक्षा प्रमाण भाषेवर जास्त लक्ष केंद्रित केल्याने वाचन संस्कृती रुजत नाही –जिल्हाधिकारी राहुल कर्डिले

**नांदेड (प्रतिनिधी)–** महाराष्ट्रात वाचन संस्कृती न रुजण्याची अनेक कारणे सांगितली जातात. यावर अनेकांनी आकलन केले आहे.मात्र आपण बोलीभाषेपेक्षा प्रमाणभाषेवर अधिक लक्ष केंद्रित करीत आहोत.कोणत्याही भाषेचा मुख्य गाभा त्या भाषेतील लवचिकता, साधेपणा, सौंदर्य आहे. अलीकडे भाषेमधून लवचिकता, साधेपणा कमी होत चालला आहे आणि बोलीभाषा लक्ष केंद्रित न केल्याने वाचन संस्कृती रुजत नसल्याचे मत जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी मंगळवारी येथे बोलताना व्यक्त केले.



नरहर कुरुंदकर प्रतिष्ठान द्वारा ज्येष्ठ साहित्यिक, विचारवंत नरहर कुरुंदकर यांच्या ४४ व्या स्मृतिदिनानिमित्त वाचन, साद आणि प्रतिसाद विषयावर जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्याशी अनौपचारिक संवाद या कार्यक्रमाचे आयोजन सायन्स महाविद्यालयाच्या पुरणमल लाहोटी सभागृहात करण्यात आले होते. व्यासपीठावर संवादक डॉ. विश्वाधार देशमुख यांची उपस्थिती होती.

या संवाद कार्यक्रमात डॉ. विश्वाधार देशमुख यांनी जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांना त्यांचा वाचन प्रवास, वाचनाचे महत्त्व, वाचन संस्कृतीचा विकास आणि ऱ्हास आदींवर प्रश्न विचारून बोलते केले.

वाचन संस्कृती वृद्धिंगत करण्यासाठी काय करता येईल यावर बोलताना जिल्हाधिकारी राहुल कर्डिले म्हणाले की, जसे फिल्म अँप्रिसिएशनचे कोर्स असतात. तसेच साहित्य ॲप्रिसिएशनचे कोर्सेस असायला पाहिजे, जेणेकरून साहित्यातील सौंदर्य उलगडेल, साहित्यातील श्रेष्ठ कलाकृती व रसग्रहण माहिती मिळेल. साहित्य वाचनाने जीवनाला रस येतो नाही तर कोरडेपणा राहतो. वाचनातून जीवनाकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलतो. भाषा घडविण्यासाठी वाचन अत्यंत महत्त्वाचे आहे, असे सांगून दलित आत्मकथांमध्ये प्रचंड ताकद आहे. दलित आत्मकथा म्हणजे वैचारिक क्रांतीच आहे, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी कर्डिले यांनी केले.

पुढे बोलताना आपली वाचनाची आवड कशी विकसित होत गेली हे सांगताना जिल्हाधिकारी कर्डिले यांनी आपले वडील शिक्षक असल्याने ग्रंथालयातून पुस्तक आणायचे, यामुळे घरामध्ये वाचनाचे चांगले व्यासपीठ तयार झाले व वाचनाची आवड निर्माण झाल्याने सलूनमध्ये जाऊन पेपर वाचल्याची आठवणही सांगितली.

सध्या मोबाईलच्या युगात तरुणांमध्ये वाचन संस्कृती लोप पावत असल्याचे दिसून येते. यावर बोलताना ते म्हणाले की, सध्याचा काळ कठीण आहे. आजच्या तरुणाईवर मोबाईलचे आक्रमण झाले असून, मेंदूवर रिल्सने बंबार्डिंग होत असल्याचे म्हणाले. या अनौपचारिक संवादात जिल्हाधिकारी कर्डिले यांनी यशवंतराव चव्हाण, नारायण सुर्वे, ग्रेस व वपू काळे, विंदा करंदीकर आदी लेखक, कवींची पुस्तके वाचल्यांचे संदर्भ दिले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक बालासाहेब पांडे यांनी तर आभार प्रदर्शन प्रा. शामल पत्की यांनी केले. कार्यक्रमाला विविध क्षेत्रातील मान्यवरांसह प्राध्यापक, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



**नांदेड :** जनसंघाचे माजी अध्यक्ष तथा अंत्योदय प्रणेते थोर विचारवंत पंडित दिनदयाल उपाध्याय यांच्या पुण्यतिथीनिमित्त भाजप महानगर कार्यालय येथे त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून त्यांना अभिवादन करण्यात आले. यावेळी माजी मुख्यमंत्री खा. अशोकराव चव्हाण, महानगराध्यक्ष तथा माजी आ. अमरनाथ राजूरकर, महापौर कविता मुळे, सभागृहनेता ॲड. महेश कनकदंडे, चैतन्यबापू देशमुख, महेश खोमणे, विजय येवनकर, डॉ. मनोजराज भंडारी, प्रवीण साले, दिलीप कंदकुर्ते, शितल खांडील, शशीकांत क्षीरसागर, व्यंकट मोकले, दत्ता पाटील कोकाटे, मिलिंद देशमुख, नागनाथ गड्डम, अमितसिंह तेहरा, किशोर भवरे, नगरसेवक आशिष नेरलकर, राज यादव, भालचंद्र पवळे, संदीप सोनकांबळे, मनोज जाधव, विपुल मोळके, सुमित मुथा, छोटा बंडू पावडे, अक्षय अमिलकंठवार, माजी जि. प. अध्यक्षा मंगाराणी अंबुलगेकर आदी दिसत आहेत. (छाया : करणसिंह बैस)

## श्री नगरेश्वर वैश्य मंदिर येथे अखंड हरिनाम सप्ताहास प्रारंभ

**नांदेड (प्रतिनिधी) –**येथील श्री नगरेश्वर वैश्य मंदिर, सराफाच्या वतीने दि. ९ फेब्रुवारीपासून ७० व्या अखंड हरिनाम सप्ताहास प्रारंभ झाला आहे. सदरील सप्ताह दि. १६ फेब्रुवारीपर्यंत चालणार आहे. यानिमित्त शिवमहापुराण कथाकार वे.शा.सं. विनायक गांधे महाराज कासारखेडकर यांच्या अमृतवाणीतून शिवमहापुराण कथा ज्ञानयज्ञाचा भाविक लाभ घेत आहेत.

नित्य कार्यक्रमात सकाळी ५ ते ७ काकडा, १० ते १२ गाथा भजन, दुपारी १ ते ४ शिवमहापुराण कथा, सायंकाळी ५ ते ६ हरिपाठ व सायंकाळी ७ ते ९ हरिकीर्तन आदी कार्यक्रम संपन्न होत आहेत.

महाशिवरात्रीनिमित्त रविवार, दि. १५ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ५ ते ७ ह.भ.प. महेश महाराज शेवाळकर यांचे कीर्तन व तद्नंतर श्री महादेवाची पालखी मिरवणूक निघणार आहे. दि. १६ फेब्रुवारी रोजी सांगता समारोहात सकाळी १०.३० ते १२.३० ह.भ.प. माणिक महाराज शास्त्री गंगाखेड यांचे काल्याचे कीर्तन व तद्नंतर महाप्रसाद भंडारा होणार आहे. तरी भाविकांनी श्रवणाचा, दर्शनाचा व महाप्रसादाचा लाभ घ्यावा, असे आवाहन विश्वस्त मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.

## रेणुकाबाई नरवाडे यांचे निधन

**नांदेड (प्रतिनिधी)-** शहराच्या पालीनगरमधील ज्येष्ठ नागरिक रेणुकाबाई सटवाजी



नरवाडे खुरगावकर यांचे बुधवार, दि. ११ फेब्रुवारी रोजी संध्याकाळी ५ वाजता वृद्धापकाळाने निधन झाले. त्या १०५ वर्षांच्या होत्या. सेवानिवृत्त प्राचार्य बाबाराव नरवाडे व स्टेट बँक ऑफ इंडियामधील कॅशियर शंकर नरवाडे यांच्या त्या मातोश्री होत. दिवंगत रेणुकाबाई सटवाजी नरवाडे यांच्या पश्चात २ मुले, सुना, ४ मुली, जावई, नातू, पणतू असा मोठा परिवार आहे. दिवंगत रेणुकाबाई सटवाजी नरवाडे खुरगावकर यांच्या पार्थिवावर गुरुवार दि. १२ फेब्रुवारी रोजी सकाळी ११.३० वाजता खुरगाव येथील मूळ गावच्या स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. तथागतनगर जवळील पालीनगर येथील निवासस्थानापासून त्यांची अंत्ययात्रा काढण्यात येणार आहे.

## महापौर व उपमहापौर यांच्याकडून गोवर्धनघाट स्मशानभूमीची प्रत्यक्ष पाहणी

### सोयी-सुविधा पूरविण्याच्या केल्या पालिका प्रशासनाला सूचना



**नांदेड (प्रतिनिधी) –**येथील महानगरपालिकेच्या नवनियुक्त महापौर कविता मुळे आणि उपमहापौर दीपकसिंग रावत यांनी बुधवार, दि. ११ रोजी शहरातील गोवर्धनघाट स्थित वैकुंठधाम स्मशानभूमीला भेट देऊन तेथील सोयी-सुविधांची प्रत्यक्ष पाहणी केली. शहराचा कार्यभार स्वीकारल्यानंतर सार्वजनिक सुविधांच्या सक्षमीकरणावर भर देण्याच्या दृष्टीकोणातूनही पाहणी करून सोयी सुविधा पुरविण्याकडे लक्ष द्यावे, अशा सूचना पालिका प्रशासनाला केल्या आहे.

या पाहणी दरम्यान स्मशानभूमी परिसरातील स्वच्छता नेटकी ठेवण्यासह मोडकळीस आलेल्या पिंजऱ्यांची तात्काळ दुरुस्ती करण्याचे निर्देश महापौर सौ. मुळे यांनी यावेळी दिले. त्याचप्रमाणे अंत्यविधीसाठी येणाऱ्या नागरिकांसाठी पिण्याचे शुद्ध पाणी, बसण्यासाठी बेंचेस आणि पुरेसा प्रकाश (स्ट्रीट लाईट्स) असणे आवश्यक असून, नादुरुस्त दिवे त्वरित बदलण्याच्या सूचना देण्यात आल्या. स्मशानभूमीतील मुख्य ओटे आणि शेडची दुरावस्था झाली असल्यास त्याची दुरुस्ती तातडीने करण्याचे आदेश उपमहापौर रावत यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाला दिले. याठिकाणी विद्युत दाहीनींचे काम बऱ्याच दिवसांपासून प्रलंबित असून, या विद्युत दाहीनीचे काम तातडीने पूर्ण करण्याची सुचना यावेळी महापौरांनी केली.

यावेळी महापौर कविता मुळे म्हणाल्या की, नांदेड शहराला स्वच्छ, सुंदर आणि सुरक्षित बनवण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. स्मशानभूमीसारख्या संवेदनशील ठिकाणी नागरिकांना कोणतीही गैरसोय होऊ नये, यासाठी महापालिका प्रशासन तत्परतेने काम करेल. या पाहणी दौऱ्यात सभागृह नेते ड.महेश कनकदंडे, अतिरिक्त आयुक्त गिरीश कदम, कार्यकारी अभियंता दिलीप टाकळीकर, महापौर प्रतिनिधी संतोष मुळे यांच्यासह संबंधित विभागाचे अधिकारी आणि स्थानिक नगरसेवक तुलजाराम यादव उपस्थित होते.

## राष्ट्रीय बेसबॉल स्पर्धेसाठी श्वेता जाधवची निवड

- दिल्ली येथे होणाऱ्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत करणार महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व
- केंद्रिय मंत्री मुरलीधर मोहोळ यांच्याकडून कौतुक

**भोकर (प्रतिनिधी) –**येथील श्री शाहू महाराज विद्यालयातील विद्यार्थिनी श्वेता शिवाजी जाधव हिची राष्ट्रीय बेसबॉल स्पर्धे साठी निवड झाली. या संदर्भात केंद्रीय नागरी उड्डाणमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी पत्राद्वारे श्वेता जाधव हिचे कौतुक केले.



भोकर शहरातील शहीद प्रफुल्लनगरातील रहिवाशी श्री शाहू महाराज विद्यालयात इयत्ता सातवीत शिकत असलेली श्वेता जाधव या विद्यार्थिनीच्या कुटुंबात आई-वडील व चौघी बहिणी असा परिवार असून, वडील एसटी महामंडळात मेकॅनिक आहेत. सामान्य कुटुंबातील विद्यार्थिनी श्वेताला लहानपणापासून मैदानी खेळासह मार्शल आर्ट कराटेमध्ये आवड आहे. आयपीएस होण्याचे स्वप्न उराशी बाळगणाऱ्या श्वेताने इयत्ता सातवीतच राष्ट्रीय बेसबॉल स्पर्धेत महाराष्ट्र राज्याचे प्रतिनिधित्व करीत संघात कामगिरी बजावणार आहे.

सश्वेता जाधवने स्वतःसह पालकांचे, शाळेचे एकंदरीत गावांसह, जिल्ह्याचेच नव्हे राज्याचे नावं राष्ट्रीय पातळीवर उज्वल करीत आहेत.

## नारायण कदम यांचा अभीष्टचिंतन सोहळा उत्साहात

**नांदेड (प्रतिनिधी)–** सरपंच परिषदेचे जिल्हाध्यक्ष तथा नांदेड उत्तर विधानसभा मतदारसंघातील शिवसेनेचे नेते नारायण कदम यांचा वाढदिवस उत्साहात पार पडला. यावेळी नांदेड दक्षिणचे आ. आनंदराव बोंढारकर, आ. बालाजीराव कल्याणकर, गोदावरी समुहाच्या अध्यक्षा राजश्रीताई पाटील, सौ. संध्याताई कल्याणकर आदींनी त्यांना शुभेच्छा दिल्या.



खडकी वडवणा ग्राम-पंचायतीचे सरपंच ते नांदेड उत्तर भागातील सामाजिक कार्यात अग्रेसर राहिलेले नारायण कदम यांचा अभीष्टचिंतन सोहळा काल विविध कार्यक्रमाने पार पडला. आयोजित करण्यात आलेल्या अभीष्टचिंतन सोहळ्याला राजेश पावडे, सुहास कल्याणकर, गंगाधर बडूरे, उमेश मुंडे, योगेश मुंडे, दर्शनसिंग सिद्धू, अनिल पाटील बोरगावकर, सुखदेव जाधव, देविदास मामा सरोदे, बबनराव वाघमारे, संतोष भारसावडे, गणेश बोखारे, नवनाथ काकडे, काशिनाथ मामा, डॉ. दिनेश निखाते, राष्ट्रवादीचे गणेश शिंदे, धनंजय कुलकर्णी यांच्यासह नांदेड उत्तर विधानसभा मतदारसंघातील अनेक ग्रामपंचायतचे सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, शिवसेनेचे आजी-माजी पदाधिकारी, विविध राजकीय पक्षातील नेते मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होती.

## खा. डॉ. अजित गोपछडे यांची गृहमंत्री अमित शाह यांच्याशी भेट

### सीमासुरक्षा, राष्ट्रीय भाषा व मराठवाडा विकासाबाबत निवेदन

**नांदेड (प्रतिनिधी)–** राज्यसभा खासदार डॉ. अजित गोपछडे यांनी भारताचे केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची सदिच्छा भेट घेऊन देशपातळीवरील तसेच मराठवाडा प्रदेशाच्या विकासाशी निगडित विविध महत्त्वपूर्ण विषयांवर सविस्तर निवेदने सादर केली. राष्ट्रीय समावेशकता, ग्रामीण अर्थकारण बळकटीकरण, अंतर्गत सुरक्षा आणि सीमाव्यवस्थापन यांसारख्या व्यापक विषयांचा या निवेदनांमध्ये समावेश होता.



डॉ. गोपछडे यांनी भारतीय सांकेतिक भाषेला भारताची २३ वी अधिकृत भाषा म्हणून मान्यता देण्याची मागणी विशेषत्वाने मांडली. दिव्यांग नागरिकांचे समान हक्क, प्रतिष्ठा आणि न्याय, शिक्षण व सार्वजनिक सेवांमधील प्रभावी सहभागासाठी ही मान्यता अत्यावश्यक असल्याचे त्यांनी अधोरेखित केले. यासंदर्भात लोकसभेत २३ मार्च २०२१ रोजी विचारविनिमय झाल्याचा उल्लेख करत, केनिया व दक्षिण आफ्रिका यांसारख्या देशांनी सांकेतिक भाषेला दिलेल्या संवैधानिक मान्यतेची उदाहरणेही त्यांनी निदर्शनास आणून दिली.

याशिवाय, मराठवाडा प्रदेशातील ग्रामीण अर्थव्यवस्था सुदृढ करण्यासाठी नांदेड जिल्ह्यात स्वतंत्र सहकारी दूध संघ स्थापन करण्याचा प्रस्ताव त्यांनी मांडला. दुग्धव्यवसाय हा लहान व सीमांत शेतकऱ्यांसाठी महत्त्वाचा पूरक उत्पन्न स्रोत असल्याने संघटित रचनेद्वारे उत्पादकता वाढ, योग्य दरनिर्धारण, ग्रामीण रोजगारनिर्मिती आणि शाश्वत विकासाला चालना मिळेल, असे त्यांनी नमूद केले. या उपक्रमासाठी राष्ट्रीय सहकारी विकास महामंडळामार्फत तांत्रिक व आर्थिक सहाय्य उपलब्ध करून देण्याची विनंतीही करण्यात आली.

राष्ट्रीय सुरक्षेच्या व्यापक दृष्टिकोनातून भारताच्या १५,१०६.७ कि.मी. लांबीच्या जमीन सीमेचे आणि ७,५१६.६ कि.मी. किनारपट्टीचे अधिक परिणामकारक व्यवस्थापन करण्यासाठी एकात्मिक सीमा व्यवस्थापन प्रणाली अधिक बळकट करण्याचा मुद्दाही त्यांनी उपस्थित केला. विविध सुरक्षा दलांमधील समन्वय वाढवून सीमासुरक्षेची कार्यक्षमता अधिक सक्षम करण्याची गरज त्यांनी अधोरेखित केली. गृहमंत्री अमितभाई शाह यांनी सादर करण्यात आलेल्या सर्व विषयांची गांभीर्याने दखल घेत सकारात्मक विचार केला जाईल, अशी भावना व्यक्त केल्या आहेत.

डॉ. अजित गोपछडे यांच्या या भेटीद्वारे राष्ट्रीय प्रश्नांवर विधायक संवाद साधला गेला असून, देशहिताच्या विविध अंगांना स्पर्श करणाऱ्या विषयांवर केंद्र सरकारसमोर ठोस मांडणी करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

## सरळसेवेतील लिपिक टंकलेखक गट-क पदभरती परीक्षेची तारीख जाहीर

**नांदेड (प्रतिनिधी)–**जिल्हा सैनिक कल्याण विभाग तसेच विभागाच्या अधिपत्याखालील जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयातील लिपिक टंकलेखक (गट-क) या पदांसाठीची सरळसेवा भरती प्रक्रिया राबविण्यात येत आहे. एकूण ७२ पदांसाठी ही भरती करण्यात येणार आहे.

या पदांसाठीची ऑनलाईन परीक्षा टीसीएस आयओएनमार्फत दिनांक १४ मार्च २०२६ रोजी दुपारी १ ते ३ या वेळेत घेण्यात येणार असून www.mahasainik.maharashtra.gov.in या वेबसाईटवर प्रसिद्ध केली आहे, अशी माहिती निवासी उपजिल्हाधिकारी तथा जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी, नांदेड यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिली आहे.


**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.



फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ / मुंबई ९९६७०६२३५४ ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com